॥श्री राम समर्थ॥ ॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड मो. ९७६७०४०८४३ ७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६), पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रँड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २१३ वा | सोमवार, दि.३० मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

# खरीप धोक्यात! 'एल निनो', युद्ध आणि आयात धोरणाने शेतकरी कोंडीत

**सोलापूर (सचिन जाधव):-** आगामी खरीप हंगामावर यंदा अनेक पातळ्यांवरील संकटांचे सावट निर्माण झाले असून हवामानातील अनिश्चितता, जागतिक राजकीय तणाव, खतांची संभाव्य टंचाई आणि शेतीमालाच्या आयातीचे धोरण यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठी धास्ती निर्माण झाली आहे. विशेषतः 'एल निनो'च्या शक्यतेमुळे पावसाबाबत संभ्रम, तर अमेरिका-इराण तणावामुळे खतपुरवठ्यावर परिणाम आणि अमेरिकन शेतीमाल आयातीच्या निर्णयामुळे बाजारभाव कोसळण्याची भीती व्यक्त होत आहे.

**'एल निनो'चा धोका; पावसाबाबत अनिश्चितता**

प्रशांत महासागरात ह्यएल निनो'ची स्थिती निर्माण होण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर दक्षिण आशियात दुष्काळी परिस्थिती निर्माण होऊ शकते, असा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे यंदाचा पावसाळा वेळेत सुरू होईल का, पुरेसा पाऊस पडेल का आणि खरीप पेरण्या नियोजनाप्रमाणे होतील का, याबाबत शंका उपस्थित होत आहेत.

पावसाचा लहरीपणा वाढल्यास सोयाबीन, मका, कापूस यांसारख्या पिकांवर थेट परिणाम होण्याची शक्यता आहे. पेरण्या उशिरा झाल्यास उत्पादन घटण्याचा धोका निर्माण होईल, अशी भीती शेतकऱ्यांत व्यक्त होत आहे.

**जागतिक तणावामुळे खतपुरवठा धोक्यात**

दुसरीकडे अमेरिका-इराण संघषार्मुळे पश्चिम आशियातील नैसर्गिक वायू आणि फॉस्फेटसारख्या खतांच्या कच्च्या मालाच्या पुरवठ्यावर परिणाम होत आहे. होर्मुज सामुद्रधुनीतील वाहतुकीवर परिणाम झाल्याने रशिया, युक्रेन, बेलारूस, कॅनडा आदी देशांतून होणाऱ्या खतांच्या आयातीवरही परिणाम जाणवत आहे.

सध्या युरियाची काही प्रमाणात टंचाई जाणवत असून, इतर खतांचा मर्यादित साठा उपलब्ध आहे. मात्र, युद्ध दीर्घकाळ सुरू राहिल्यास ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये मोठ्या प्रमाणात खतटंचाई आणि दरवाढ अटळ ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. खरीप हंगामासाठी जूनपूर्वी खतसाठा करणे आवश्यक असते, त्यामुळे परिस्थिती गंभीर बनू शकते.

खत उद्योगातील जाणकार विजयराव पाटील यांच्या मते, 'सध्या दोन महिन्यांचा साठा आहे; मात्र युद्धावर तोडगा निघाला नाही तर पुढील काळात तुटवडा भासू शकतो. दरवाढ नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकारला अनुदान वाढवावे लागू शकते.'

**अमेरिकन आयातीचा धोका; दर घसरण्याची भीती**

खतांचा प्रश्न सुटला आणि पाऊस चांगला झाला तरीही शेतकऱ्यांसमोर आणखी एक मोठे संकट उभे ठाकले आहे. अमेरिकेतून कापूस, सोयाबीन आणि मक्याच्या आयातीची शक्यता वर्तवली जात आहे.




केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी कापूस आयातीवरील शुल्क शून्य टक्के करण्याचे संकेत दिल्याने बाजारपेठेत चिंता वाढली आहे. त्याचबरोबर कुक्कुटपालन उद्योगातून जीएम सोयापेंड आयातीची मागणी होत आहे.

यंदा आधीच मक्याचे दर हमीभावापेक्षा कमी (१५-१६ रुपये किलो) मिळाले आहेत. अशा स्थितीत आयात वाढल्यास कापूस, सोयाबीन आणि मक्याचे दर आणखी कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडण्याची भीती व्यक्त होत आहे.

शेतीमाल बाजार अभ्यासक विजय जावंधिया यांनी इशारा देताना सांगितले की, 'सरकारने आयातीवर किमान हमीभावाची अट घालणे गरजेचे आहे. अन्यथा शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होईल.'

**मोठ्या क्षेत्रावर परिणाम**

देशातील सुमारे १,१०० लाख हेक्टर खरीप क्षेत्रापैकी सुमारे ३५० लाख हेक्टरवर कापूस, सोयाबीन आणि मका ही प्रमुख पिके घेतली जातात. या तिन्ही पिकांवर एकाचवेळी हवामान, खत आणि बाजारभाव या तिन्ही घटकांचा परिणाम होणार असल्याने परिस्थिती अधिकच चिंताजनक बनली आहे.

**सरकारची भूमिका; उपाययोजनांची तयारी**

दरम्यान, कृषी विभागाने परिस्थितीवर लक्ष ठेवले असून संभाव्य संकटांना तोंड देण्यासाठी उपाययोजना सुरू असल्याचे सांगितले आहे. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, 'खतांचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. अमेरिकन आयातीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ दिले जाणार नाही. पावसाबाबत अंतिम अंदाज आल्यानंतर योग्य नियोजन केले जाईल.'

याशिवाय शेततळे, सूक्ष्म सिंचन, शाश्वत शेतीसाठी विविध योजना राबवण्यात येत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**एकूणच परिस्थिती गंभीर**

हवामानातील अनिश्चितता, जागतिक राजकारण, खतांची उपलब्धता आणि आयात धोरण या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम यंदाच्या खरीप हंगामावर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी, कृषी तज्ज्ञ आणि प्रशासन यांच्यासाठी हा हंगाम मोठे आव्हान ठरणार आहे.

जर वेळेत पाऊस, पुरेशा प्रमाणात खते आणि संतुलित आयात धोरण मिळाले, तरच खरीप हंगाम सावरण्याची आशा आहे; अन्यथा शेतकऱ्यांसाठी हा हंगाम आर्थिकदृष्ट्या अत्यंत कठीण ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आरोग्यविषयक
मुळव्याध आहे?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450

## महिला कुस्ती स्पर्धेसाठी शासनाचा भक्कम पाठिंबा- पालकमंत्री गोरे

## चौथी महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा उत्साहात संपन्न

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** हरीभाई देवकरण प्रशालेच्या प्रांगणात चौथी महिला महाराष्ट्र केसरी व वरिष्ठ गट महिला राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा तसेच विविध गटातील पुरुष कुस्ती स्पर्धेसाठी 25 लाखाचा निधी जाहीर केला. तर पुढील वर्षीपासून महिला कुस्ती स्पर्धेसाठी 50 लाखाचा निधी देण्याबाबत मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे प्रस्ताव देण्यात येणार असल्याचे सांगून पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी महिला कुस्ती स्पर्धेला शासनाचा भक्कम पाठिंबा असल्याचे सांगितले.



हरीभाई देवकरण प्रशालेच्या प्रांगणात आयोजित महिला महाराष्ट्र केसरी व वरिष्ठ गट महिला राज्यस्तरीय अजिंक्य स्पर्धा कुस्ती स्पर्धेच्या समारोप प्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे बोलत होते. या वेळी आमदार सचिन दादा कल्याण शेट्टी, सागर कल्याणशेट्टी, नगरसेविका रोहिणी तडवळकर, सुधा मोरे, अक्कलकोट अन्नछत्र ट्रस्टचे अध्यक्ष जन्मेजय राजे भोसले, स्वाती साखरे आदी मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री गोरे म्हणाले की, कैलासवासी सिद्धाराम साखरे यांच्या स्मरणार्थ आयोजित ही कुस्ती स्पर्धा महिलांच्या कुस्ती क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे. महाराष्ट्रातील रणरागिनींना राष्ट्रीय पातळीवर ओळख मिळवून देण्याचे कार्य या स्पर्धेच्या माध्यमातून होणार आहे. कुस्तीपटू गीता व बबीता फौगाट यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे नाव उज्ज्वल केले असून त्यांच्याप्रमाणे महाराष्ट्रातील महिला खेळाडूही पुढे येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

स्पर्धेतील अंतिम सामन्यात कोल्हापूरच्या अमृता पुजारी यांनी हिंदकेसरी किताब पटकावला. या स्पर्धेत मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऐश्वर्या हिब्बारे यांनी केले.

## ३३ हजारांच्या लाचप्रकरणी तलाठी रंगेहाथ जेरबंद

### मोहोळ तालुक्यातील महसूल विभागात खळबळ

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील वाफळे गावाच्या हद्दीत सुरू असलेल्या अवैध मुरूम उपश्यावर कारवाई न करण्यासाठी ३३ हजार रुपयांची लाच मागणाऱ्या तलाठ्याला सोलापूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने विठ्ठलवाडी (ता.माढा) येथे रंगेहाथ पकडले. सुदर्शन जाधव (तलाठी, वाफळे) असे अटक करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. वाफळे गावाच्या हद्दीत जेसीबी व टिपरच्या साहाय्याने मुरूम उपसा सुरू होता. या प्रकरणात कारवाई टाळण्यासाठी तलाठी जाधव यांनी ३३ हजार रुपयांची लाच मागितली होती. त्यापैकी शुक्रवारी (ता. २७



मार्च) २३ हजार रुपये स्वीकारण्यात आले. उर्वरित १० हजार रुपये शनिवारी (ता. २८ मार्च) सायंकाळी विठ्ठलवाडी येथे स्वीकारताना लाचलुचपत विभागाने सापळा रचून आरोपीला रंगेहात अटक केली. या कारवाईमुळे महसूल विभागात एकच खळबळ उडाली आहे. आरोपीविरुद्ध माढा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

शिनगारे सिटी वासुद रोड अल्टिमेट जिमच्या समोर सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम 8275274353
डी.बी.शिंदे 9579421465

## सोलापूर जिल्हा परिषदेने १०० पैकी ८० गुण मिळवत राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या १५० दिवस सेवाकर्मी कार्यक्रमाच्या गुणांकनात सोलापूर जिल्हा परिषदेने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांना आज रोजी मंत्रीमंडळ सभागृह, सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे "उत्कृष्ट कार्यालय प्रमुख" म्हणून प्रशस्तिपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले.



"महाराष्ट्र शासनाच्या १५० दिवस सेवाकर्मी कार्यक्रमातील पारदर्शकता, शिस्तबद्धता आणि कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणावर दिलेला भर यामुळे सोलापूर जिल्हा परिषदेने प्रशासनाच्या कार्यक्षमतेचा ठसा उमटला व राज्यात पहिला क्रमांक मिळवला. जिल्हा परिषदेने केलेली ही कामगिरी सर्व विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या सांघिक कामाचे यश आहे. हा पुरस्कार मिळाला याचा आनंद आहे, परंतु आपली जबाबदारी अधिक वाढलेली असून पुढे असेच काम करत राहू याची खात्री ही आहे."
— **कुलदीप जंगम,** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर.

जिल्हा परिषदेने सेवाकर्मी कार्यक्रमातील विविध निकषांवर १०० पैकी ८० गुण मिळवत राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला. ज्येष्ठता सूची, पदोन्नती व सरळसेवा नियुक्तीची स्थिती, बिंदुनामावली प्रमाणीकरण, अनुकंपा नियुक्ती, ऋडळ पोर्टलवरील प्रशिक्षण पूर्णता आणि सेवापुस्तक अद्ययावत करणे या सर्व बाबींमध्ये सोलापूर जिल्हा परिषदेने उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

**सोलापूर जिल्हा परिषदेचा सेवाकर्मी कार्यक्रमातील आदर्श ठसा**

ग्रामविकास विभागाच्या अधिनस्त स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांचे कार्यमूल्यांकन करण्यासाठी सेवाकर्मी कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमात सोलापूर जिल्हा परिषदेने राज्यातील इतर सर्व जिल्हा परिषदांना मागे टाकत प्रथम क्रमांक मिळवला.

**गुणांकन अहवालानुसार:**

- ज्येष्ठता सूची : ५७ पैकी सर्व संवर्गांची अद्ययावत ज्येष्ठता सूची प्रसिद्ध (१०/१० गुण).
- पदोन्नती नियुक्ती : मंजूर ९५९ पदांपैकी ८२० कार्यरत, रिक्त पदांचे प्रमाण १४.४९% असूनही कार्यवाही उत्कृष्ट (१०/१० गुण).
- सरळसेवा नियुक्ती : मंजूर १३,००७ पदांपैकी ११,४२५ कार्यरत, रिक्त पदांचे प्रमाण १२.१६% (१०/१० गुण).
- बिंदुनामावली प्रमाणीकरण : ५७ पैकी ५५ संवर्गांची बिंदुनामावली प्रमाणित (९४.७४%) (१०/१० गुण).
- अनुकंपा नियुक्ती : उपलब्ध १६८ पदांवर सर्व नियुक्त्या पूर्ण (१०/१० गुण).
- iGOT पोर्टल प्रशिक्षण : १२,१२७ कर्मचाऱ्यांपैकी सर्वांचे रजिस्ट्रेशन पूर्ण, त्यापैकी ९५.१०% कर्मचाऱ्यांनी ५ कोर्स पूर्ण केले (१०/१० गुण).
- सेवापुस्तक अद्ययावत : १२,१२७ पैकी १२,०३९ सेवापुस्तके अद्ययावत (९९.२७%) (२०/२० गुण).

या सर्वांमुळे सोलापूर जिल्हा परिषदेने १०० पैकी ८० गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळवला. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कुलदीप जंगम यांच्या नेतृत्वाखालील ही कामगिरी केवळ सोलापूर जिल्हा परिषदेपुरती मर्यादित नसून राज्यातील इतर जिल्हा परिषदांसाठीही आदर्श ठरली आहे.

## 6 वर्षीय चिमुकल्याचे डॉक्टरने दुसरेच बोट काढले

### चौकशीसाठी समिती गठीत




**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** सरकारी रुग्णालयातील अनास्था अनेकदा पाहायला मिळत असते, त्यानिमित्ताने सरकारी यंत्रणेचा चेहरा उघडा पडतो. कधी रुग्णालयात बेडची कमतरता असल्याने रुग्णांना खालीच झोपवण्यात येते.

तर, कधी डॉक्टरच वेळेवर उपलब्ध नसल्याने रुग्णांचा ताटकळत बसावे लागते हेही चित्र अनेकदा पाहायला मिळत आहेत. आता, सोलापूर जिल्ह्यातील पंढरपुरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका 6 वर्षीय चिमुकल्या मुलाचे बोट कापण्यासाठी तो रुग्णालयात आला असता, डॉक्टरांनी उजव्याऐवजी डाव्या हाताचे बोट काढल्याने कुटुंबीयांनी संताप व्यक्त केला आहे. यप्रकरणी, आता प्रशासनाकडून चौकशी देखील करण्यात येणार आहे.

पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयातील सावळा गोंधळ पुन्हा एकदा समोर आला असून एका सहा वर्षाच्या मुलाचे उजव्या हाताचे बोट काढायचे असताना महिला डॉक्टरने त्याच्या डाव्या हाताच्या बोटाचे ऑपरेशन करण्याचा महाप्रताप केला आहे. ही बाब समजतात संतप्त पालकांनी तक्रार केल्यानंतर आता प्रशासन खडबडून जागे झाले असून त्या महिला डॉक्टर विरोधात चौकशी समिती नेमणार असल्याचे जाहीर केले आहे. मात्र, सहा वर्षाच्या मुलाच्या शस्त्रक्रियेत अशा पद्धतीने झालेल्या हलगर्जीपणा मुळे उपजिल्हा रुग्णालयाची अब्रू गेली आहे. तर, चिमुकल्या मुलाचा हात आयुष्यभरासाठी बाधित झाला आहे.

उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या एका सहा वर्षे मुलाच्या शस्त्रक्रियेत उजव्या हाताऐवजी त्याचे डाव्या हाताचे बोट काढून (पान 2 वर..)

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिझेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

## सोलापूर जिल्ह्यात पेट्रोल-डिझेल पुरवठा सुरळीत असल्याने मार्च रोजी चा आदेश रद्द

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याने पूर्वी जारी करण्यात आलेला आदेश रद्द करण्यात आला आहे. जीवनावश्यक वस्तू अधिनियम, 1955 अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक 20 मार्च 2026 रोजी पेट्रोल व डिझेल विक्रीसंदर्भात आदेश जारी करण्यात आला होता. यानुसार १. जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंप चालक मालक यांनी पेट्रोल/डिझेल हे केवळ वाहनाच्या इंधन टाकीतच वितरित करावे. २. कोणत्याही परिस्थितीत पेट्रोल/डिझेल खुल्या (कॅन, बाटली, डबा किंवा इतर कोणत्याही भांड्यात) विक्री/पुरवठा करू नये, असे या आदेशात नमूद करण्यात आलेले होते. सद्यस्थितीत BPCL, IOCL व HPCL या कंपन्यांकडे जिल्ह्यात पुरेसा साठा असल्याचे प्रशासनाच्या आढाव्यात स्पष्ट झाले आहे. त्यामुळे कार्यालयाचा आदेश दिनांक 20.03.2026 रद्द करण्यात आला असून हा निर्णय तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

जिल्ह्यात कृषी, औद्योगिक तसेच अन्य महत्वपूर्ण कामासाठी पेट्रोल डिझेल आवश्यक आहे. सध्या ते मुबलक (पान 2 वर..)

## तत्कालीन आयुक्तांवर कारवाईची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रक चर्चेच्या पाचव्या दिवशी परिवहन, युसीडी व शिक्षण विभागाच्या तरतुदींचा सखोल आढावा घेताना अनेक गंभीर मुद्दे ऐरणीवर आले. आकृतिबंधातील मंजूर पदे आणि प्रत्यक्ष कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या यामध्ये मोठी तफावत असल्याचे निदर्शनास आल्याने सभागृहात जोरदार चर्चा झाली. महापालिका अंदाजपत्रक आढावा



बैठकीत विविध विषयांवर चर्चा झाली. यावेळी महापौर विनायक कोंड्याल यांनी झोननिहाय नियुक्त कर्मचाऱ्यांची संपूर्ण माहिती संबंधित झोनमधील नगरसेवकांना लेखी स्वरूपात देण्याचे निर्देश विभाग प्रमुखांना दिले. परिवहन विभागाच्या विषयावर चर्चा करताना सत्ताधारी नगरसेवक आक्रमक झाले. चेसी क्रॅक प्रकरणात दोषी कोण, याबाबत आयुक्तांना जाब विचारण्यात आला. नगरसेवक राजू पाटील यांनी पूर्वीच 26 कोटींचा दंड भरला असता, तर आता दुप्पट दंड भरावा लागला (पान 2 वर..)

## संपादकीय

# अफवांचे युद्ध

इराण विरुद्ध अमेरिका आणि इस्रायल या लष्करी संघर्षाला आता एक महिना पूर्ण होत आला आहे. या तीन देशांचा सहभाग असलेले युद्ध प्रामुख्याने इराण, इस्रायलच्या भूमीवर आणि आखातातील काही देशांच्या भूमीवर लढले जात असले तरी त्याच ताकदीचे दुसरे एक युद्ध अफवांच्या माध्यमातून लढवले जात आहे.

या महिन्याभराच्या कालावधीमध्ये युद्धाच्या बातम्यांमुळे माध्यमांना ब्रेकिंग न्यूजचा मोठा मसाला मिळाला. यानिमित्ताने खरे किंवा खोटी याची फारशी खात्री न करताच बातम्या पुढे येत गेल्या. सोशल मीडियाच्या विविध प्लॅटफॉर्मनिमित्ते तर या निमित्ताने संधीच साधली आणि अफवांचा अक्षरशः बाजारच मांडला. इस्रायलचे सर्वेसर्वा बेंजामिन नेतान्याहू यांचा मृत्यू झाल्याची अफवा असो किंवा इराणचे नवे प्रमुख मोजतबा यांचासुद्धा हल्ल्यामध्ये मृत्यू झाल्याची बातमी असो किंवा तेलाच्या जहाजांचा प्रवास यावरून निर्माण झालेल्या विविध अफवा असो, माध्यमांनी अशा प्रकारच्या चुकीच्या बातम्यांना प्राधान्य देऊन समाजमन अस्वस्थ करण्याचेच काम केले. या युद्धाचा सर्वात मोठा परिणाम अप्रत्यक्षपणे सर्व जगावर झाला तो म्हणजे इंधनाचा विस्कळीत पुरवठा. साहजिकच भारतासह सर्वच देशांना इंधनाचा तुटवडा जाणवणार हे गृहीत होते. अर्थात, गेल्या महिन्याभराच्या कालावधीमध्ये अजूनही भारतात फारशी बिकट परिस्थिती निर्माण झालेली नाही. पेट्रोल आणि डीझेलचे भावही वाढवण्यात आले नाहीत. फक्त प्रीमियम पेट्रोलच्या दरामध्ये काही प्रमाणात वाढ करण्यात आली आहे. पण समाज माध्यमांनी पेट्रोल, डीझेलचेही दर अफवांच्या माध्यमातून अजून वाढवून ठेवले होते. त्यातच आता पेट्रोल आणि डीझेल संपल्याच्या अफवा पसरू लागल्याने पेट्रोल पंपांवरच्या रांगाही वाढू लागल्या आहेत. खरेतर गेल्या महिन्याभराच्या कालावधीमध्ये पेट्रोल आणि डीझेल या इंधनाच्या पुरवठ्यावर आणि त्याच्या विक्रीवर कोणताही परिणाम झाला नव्हता. एखाद्याच पेट्रोल पंपावर इंधन संपल्यामुळे पेट्रोल पंप बंद ठेवण्यात आला असावा. पण गेल्या दोन दिवसांच्या कालावधीमध्ये आता पेट्रोलची प्रचंड टंचाई अशा प्रकारच्या अफवाही पसरू लागल्या आहेत. अशा युद्धाच्या परिस्थितीमध्ये भविष्यकाळात काहीही होऊ शकते या भीतीने सर्वसामान्य नागरिक नेहमीच साठवणूक करण्याच्या मानसिकतेत असतोच. त्यातूनच स्वयंपाकाचा गॅस असो अथवा पेट्रोल डीझेल असो त्याची साठवणूक करण्याकडे लोकांचा कल वाढला होता. नेहमीच्या सर्वसाधारण मागणीपेक्षा अनेकपट मागणी या कालावधीमध्ये वाढली होती. त्याचा परिणाम थेटपणे इंधन पुरवठा साखळीवर होणे गृहीतच होते. अनेक वेळा साठेबाज अशा परिस्थितीचा फायदा करून घेऊन नफा मिळवण्यासाठी जाणीवपूर्वक टंचाईच्या अफवा पसरवतात आणि काळा बाजारांमध्ये इंधन भरमसाठ दराने विकतात असेही अनुभव यापूर्वी आले आहेत. साहजिकच अफवांच्या या बाजाराचा नक्की कोणाचा फायदा होत आहे हे सर्वसामान्य नागरिकांनीसुद्धा लक्षात ठेवणे गरजेचे आहे. अर्थात, सरकारनेसुद्धा आपली जबाबदारी टाळता कामा नये. इंधनपुरवठ्याबाबत आणि इंधनाच्या उपलब्धतेबाबत जे काही तथ्य आहे ते दररोज नागरिकांच्या समोर येणे अत्यंत आवश्यक आहे. कोविड महामारीच्या कालावधीमध्ये दररोज दुपारी तीन वाजता केंद्रातील आरोग्य विभागाचे अधिकारी पत्रकार परिषद घेऊन देशातील महामारीची परिस्थिती काय आहे याबाबत निवेदन करत असत. त्यामुळे त्या काळामध्ये अफवांवर बऱ्यापैकी नियंत्रण बसले होते. आता या युद्ध परिस्थितीमध्ये सुद्धा भारतापुरता विचार करायचा झाल्यास केंद्रातील अधिकाऱ्यांनी दररोज योग्य प्रकारचे निवेदन करून वस्तुस्थिती देशासमोर मांडायला हवी. केवळ प्रशासकीय अधिकाऱ्यांचे हे काम आहे असे नाही तर राजकीय पक्षांच्या नेत्यांनी विशेषतः सत्ताधारी नेत्यांनी आपापल्या भागातील मतदारांपर्यंत वास्तव परिस्थिती पोहोचवणे आवश्यक आहे. एखादी समस्या अस्तित्वात नसतानासुद्धा केवळ घबराटीच्या परिस्थितीमुळे ती समस्या निर्माण होते असे अनेक वेळा सिद्ध झाले आहे. गेल्या महिन्याभराच्या कालावधीमध्ये इंधन पुरवठ्याबाबत कोठेही समस्या निर्माण झाल्याचे लक्षात येत नव्हते. पण आता जर अशा अफवा तीव्र स्वरूपात पसरू लागल्या तर विनाकारणच घबराटीची परिस्थिती निर्माण होऊ शकते आणि त्याचा थेट फटका अर्थव्यवस्थेला आणि पुरवठा साखळीला बसू शकतो. हा अफवांचा बाजार आणि हे अफवांचे युद्ध थांबवण्यासाठी खरी परिस्थिती आणि वस्तुस्थिती काय आहे हे सरकारकडून लोकांपर्यंत पोहोचवणे हीच आता प्राधान्याची गोष्ट मानावी लागेल. जमिनीवरील खऱ्या युद्धापेक्षाही हे अफवांचे युद्ध जास्त भीषण, भयानक आणि नुकसानकारक असू शकते ही बाब आता गांभीर्याने लक्षात घ्यावी लागेल.

# भक्तांच्या मानगुटीवर अवतारी भोंदू



**ज्ञानेश महाराव**
(ज्येष्ठ पत्रकार)

**बोगस कॅप्टन 'कृष्णावतारी' होतो. स्वयंघोषित धर्मगुरू 'शंकर अवतारी' होतो. रेल्वे गार्ड 'साई अवतारी' होतो. नरेंद्र महाराज काडसिद्धेश्वराच्या अवतारातून गजानन महाराजांच्या अवतारात झटपट जातो. 'दिव्यदृष्टी'च्या गगनगिरी महाराजांना आपलाच अवतार दिसत नाही. श्रीकृष्णाच्या अवतार बनून कामक्रीडा करणाऱ्या आणि दत्तावतारातून योनीपूजा उरकणाऱ्यांचा उद्योग सध्या जोरात आहे.**



लंपट अशोक खरात "मी कृष्ण, तू राधा" असे म्हणत मुली- महिलांचं लैंगिक शोषण करायचा. बुवाबाजीत ही "राधा- कृष्णाची" थापेबाजी खूपच जुनी आहे. १९६२ मध्ये आचार्य प्र. के. अत्रे ह्यांचे "तो मी नव्हेच" हे नाटक रंगभूमीवर आले. त्यात महिलांना आपल्या जाळ्यात ओढणारा लफंगा "लखोबा लोखंडे" नटश्रेष्ठ प्रभाकर पणशीकर यांनी ४० वर्षे रंगभूमीवर रंगवला. त्यातील त्यांनी केलेल्या सात विविध भूमिकांत भोंदू "राधेश्याम महाराज" आहे. तो अध्यात्माची फसवी भाषा करीत विधवा भक्तिणीचे किमती दागदागिने कसे काढून घेतो; आणि तिच्या अल्पवयीन मुलीला- वेणूला कशी भोगतो आणि मारून टाकतो; ह्याचे प्रभावी चित्रण आचार्य अत्रे यांनी ह्या नाटकात केले आहे. बुवाबाजीतला हा "अवतार" उद्योग किती लंपट आणि खुनशी असतो, ते आचार्य अत्रे यांनी लेखणीने आणि प्रभाकर पणशीकर यांनी अभिनयातून प्रभावीपणे दाखवून दिलंय. (हे नाटक "युट्यूब"वर आहे. ते जरूर पहावे.) "बुवा तेथे बाया" हे नाटकही आचार्य अत्रे यांनी लिहिलंय. तरीही बुवाबाजीतलं "अवतार"नाट्य संपलेलं नाही.

अशोक खरातच्या कामलीलांचे व्हिडिओचा सपाटा सुरू असतानाच; वसई (जिल्हा : पालघर) येथील" स्वयंघोषित धर्मगुरू" कृषीकेश वैद्य ह्याचे प्रकरण जाहीर झाले. तो "मी शंकर, तू पार्वती" म्हणत मुली- महिलांना आध्यात्मिक शिक्षणाच्या नावाखाली लैंगिक शोषणाच्या जाळ्यात ओढायचा. ह्या "शंकर- पार्वती"च्या खेळात त्याने तीन वर्षांपूर्वी केलेल्या बलात्काराला आता वाचा फुटली. ह्यात पीडिता असलेल्या पुण्यातील महिलेने वसईत येऊन कृषीकेश वैद्य ह्याच्या विरोधात पोलिसांत तक्रार दाखल करताच तो फरार झाला.

देशात दुर्दशावताराचे थैमानी साम्राज्य असल्याने भक्त मंडळींना 'साक्षात अवतारा'ची आस-ओढ- आवड- आकर्षण असणे, स्वाभाविक आहे. भक्ती- अध्यात्म शास्त्रानुसार, "अवतार म्हणजे ईश्वराने मानवी देहात अवतरण करणे; उतरणे!" ह्यालाच भुताटकीच्या बनावटीत "झपाटणे" म्हणतात. असो. तर, "अवतारावर सृष्टीयंत्रणेचे कोणतेही नियंत्रण नसल्याने तो स्वेच्छेने; त्याला हव्या त्या मानवी देहात अवतरतो. अशा अवतारात 'दैवी' आणि 'मानुषी' या दोन्ही वृत्तींचे मिश्रण असते. मात्र, मानवी अवतार धारण केला असतानाही, त्या परमात्म्याची अघटित घटना घडवून आणण्याची शक्ती जागृत असते!" अशा शास्त्रशुद्ध बातांवर "अवतार" सिद्ध होतात आणि असाध्य रोग निवारणाचे चमत्कार करतात. पाण्याने दिवे पेटवतात. मुक्यांना बोलते; पांगळ्यांना धावते करतात. अशक्य ते शक्य; सारं काही करतात. पूर्वी अशा चमत्कार-साक्षात्कारांसाठी खुद्द ईश्वराला मानवी अवतारात यावे लागायचे. असेच बुद्ध, येशू ख्रिस्त, महंमद पैगंबर आले आणि त्यांचे "अवतार"कार्य करून गेले. नंतर त्यांच्या अवतारांचे अवतार येऊ लागले. त्यामुळे साईबाबांचे राष्ट्रीय ते गावठी, असे नाना अवतार आले; येत असतात.

अशाप्रकारेच साईबाबांना थोडाकाळ समकालीन असणाऱ्या 'सिद्धपुरुष' बाळूमामा यांचा "अवतार" असलेला मनोहरमामा (भोसले)चा चमत्कारिक संचार पश्चिम महाराष्ट्रात सुरू झाला होता. तो २०२१ मध्ये जेलबंद झाला. १८९२ ते १९६६ असा जीवनकाळ असलेल्या बाळूमामांचा जन्म बेळगाव जिल्ह्यातल्या चिक्कोडी तालुक्यातील 'अक्कोळ' गावातला आहे. एकांतवास, फटकून वागणे, बाभळीच्या काटेरी गादीवर झोपणे; ही 'सिद्धपुरुषा'पर्यंत नेणारी सारी लक्षणं बाळूमामांमध्ये लहानपणापासून होती. अशा चमत्कारिक साक्षात्कारीला 'अवतार'मूर्ती करण्यासाठी एक कथेकरी लागतो; तसाच 'शेटजी' ही लागतो. तसा 'चंदूलाल' नावाचा शेटजी बाळूमामाला लाभला. ह्या शेटजीच्या वृद्ध आईला बाळूमामाच्या जेवणाच्या थाळीतून तेजस्वी प्रकाश परावर्तित होताना दिसला. त्यांचे 'संत माहात्म्य' सांगणारी लोकसेवा, भविष्य- शापवाणी, चमत्कार- साक्षात्कार लोकांपर्यंत पोहोचविण्याचे महान कार्य त्यांच्या पश्चात ५५ वर्षांनी 'कलर्स- टीव्ही चॅनल'ने केले आहे.

तथापि, मेलेल्या मुलाला जिवंत करणाऱ्या बाळूमामाने त्याचवेळी देशात स्वातंत्र्यलढा जोरात सुरू असताना आपल्या दैवी शक्तीची करामत दाखवत; भगतसिंगची फाशी का नाही रोखली? खंडप्राय भारतावर राज्य करणाऱ्या चार-पाच हजार ब्रिटिशांना 'कॉलरा'-पटकीचा रोग लावून, भारतातून पळवून का लावले नाही? भारत-पाकिस्तान फाळणी का नाही टाळली? त्यांची दैवीशक्ती धनगर आणि त्यांच्या मेंढरांपुरतीच मर्यादित होती का? तसे, असेल तर ते सृष्टीच्या नियंत्रणाला फाट्यावर मारून बाळूमामाच्या रूपात अवतार घेणारे ईश्वर कसे? असे नाना प्रश्न बाळूमामांच्या सुशिक्षित भक्तांप्रमाणेच; त्यांच्या दैवी शक्तीची गाणी, चित्रपट, सिरियल लिहिणाऱ्या, बनवणाऱ्या आणि पाहाण्या-ऐकणाऱ्यांनाही पडले पाहिजे होते. पण तसे झाले नाही. कारण गिऱ्हाईकांचे पीक जोरात आहे आणि देव-धर्म-संत-स्वामींच्या चमत्काराचा धंदा जोमात आहे.

बाळूमामांचं निधन कोल्हापूर जिल्ह्यातील आदमापूर येथे झालं. दरम्यान, त्यांच्या दैवीलीलांच्या दंतकथा पसरवणाऱ्यांनी बाळूमामांच्या अंत्यसंस्काराची जागा 'समाधी' स्थान केली आणि हळूहळू त्याला मंदिराचे रूप देत आदमापूरला 'दुसरे पंढरपूर' केले. ह्याच काळात बाळूमामांच्या नावाने सातारा, सांगली, कोल्हापूर भागात १६ खंडांत फिरणाऱ्या हजारो बकऱ्या- मेंढ्या रात्री-अपरात्री शेतात घुसून शेतकऱ्यांना 'बाळूमामाचा प्रसाद' देत होत्या. आता मेंढ्या-बकऱ्यांचा प्रसादाला 'आदमापूर देवस्थान संस्थान'ने शिस्तीत आणलं आहे. त्यामुळे नाराजीची जागा सेवेने घेतलीय. तसेच, आदमापुरात भक्तांचा आणि आर्थिक स्रोत वाढता राहावा, ह्यासाठी नाना प्रकारे बाळूमामांच्या चमत्कारिक लीलांचा प्रचार-प्रसार सुरू आहे. 'यू-ट्यूब'वर तर- बाळूमामाने दर्शन दिले पासून ते बाळूमामाच्या 'सहा नंबर' खंडातील बकरा सर्व रोगांचा नायनाट करणारं दूध देतोपर्यंतच्या 'व्हिडिओं'चा धुमधडाका सुरू आहे. विज्ञान- तंत्रज्ञानाचा गैरवापर करण्याची ही बुद्धी-शक्ती बाळूमामाच देत असावा! अशा निर्बुद्ध बनवणाऱ्या अंधभक्ती प्रसारातून 'मनोहरमामा' सारखे 'बाळूमामा' अवतारी तयार होतात.

ह्या अवताऱ्याला सप्टेंबर २०२१ मध्ये पुणे ग्रामीण आणि बारामती तालुका पोलिसांनी सातार्यात अटक केली. बारामती येथील शशिकांत सुभाष खरात यांच्या वडिलांना 'कर्करोग' झाला होता. तो बाळूमामाच्या आशीर्वादाने बरा करतो, असे सांगत; तर कधी मरणाची भीती घालत, मनोहरमामाने शशिकांत खरात यांच्याकडून २ लाख ५१ हजार रुपये उकळले. त्या बदल्यात 'प्रसाद' म्हणून बाभळीचा पाला आणि साखर खाण्यास दिली. आपली फसवणूक होत असल्याचे लक्षात येताच; शशिकांत खरात यांनी पैसे परत मागितले. तेव्हा त्यांना मनोहरमामाने जीवे मारण्याची धमकी दिली.

हे प्रकरण पोलिसांत दाखल होण्यापूर्वी सोलापूर-करमाळा येथे एका महिलेने बलात्काराची तक्रार दाखल केली. आणखी एक फिर्याद बारामती तालुक्यातील महेश आटोळे यांनी केली. ती बुवालोकांच्या दलालीवर प्रकाश टाकणारी आहे. आटोळे यांनी आपली व्यावसायिक कामं मार्गी लावण्याच्या बदल्यात आपले ४० लाख रुपयांचे 'रो हाऊस' मनोहरमामाला वापरण्यास दिले. पण कुठलीच कामं न झाल्याने आटोळे यांनी 'रो हाऊस' परत मागितले. तेव्हा मामा म्हणाला, "तुज्या कामासाठी तंत्रविधी करण्यास माझे लाखो रुपये खर्च झाले आहेत. ते दे, मगच तुला 'रो हाऊस'चा ताबा देईन!" मनोहरमामाने अटक होण्यापूर्वी पुण्यात 'पत्रकार परिषद' घेऊन "माज्यावरचे सारे आरोप खोटे आणि बदनामीकारक असून, ते करणाऱ्यांवर कारवाई करीन," असे सांगितले. पण त्याने मामाची अटक टळली नाही. तेव्हा मनोहर भोसले ३९ वर्षांचा होता. इंदापूरच्या (जिल्हा : पुणे) लारसुणे गावातल्या मनोहर भोसलेला शिक्षक व्हायचे होते. पण 'डीएड'च्या परीक्षेत नापास झाल्यावर त्याने आठवडी बाजारात 'सुके बोंबील' विक्रीचा धंदा सुरू केला. पण त्यात त्याचं मन रमेना. एक दिवस तो गायब झाला आणि काही वर्षांनी 'बंगाली विद्या'पती म्हणून गावात प्रकटला. आजूबाजूच्या गावातील लोक त्याच्याकडे 'भूत' उतरवायला येऊ लागले. पण ह्या उद्योगात अपेक्षित कमाई होत नसल्याने, त्याने आपल्या साथीदारांकरवी आपल्या अंगात 'बाळूमामा'चा संचार झाल्याचे घोषित केले.

ह्या 'आयडिया'ने काम केले आणि बोंबील विकणारा 'मन्या' झटपट 'बाळूमामा अवतारी सद्गुरू मनोहरमामा' झाला. झोपडीत राहणाऱ्या 'मन्या'ला 'सद्गुरू'च्या वलयाने शिवारात नेले. तो 'बाळूमामा' सारखेच चमत्कार करू लागला. भक्तांनी दिलेल्या पैशांवर त्याने सोलापुरातल्या करमाळा तालुक्यातील उंदरगावात आश्रम बांधला. ह्या "बाळूमामा अवतारी" मनोहर भोसलेला अटक होऊ नये म्हणून पुण्यातील डझनभर वकिलांनी एकत्रित येऊन बराच आटापिटा केल्या. त्यात तेव्हा "मनसे" आणि आता अजितदादांच्या "राष्ट्रवादी काँग्रेस"च्या प्रवक्त्या असलेल्या रुपाली ठोंबरे पाटील आघाडीवर होत्या. त्याच आता अशोक खरात प्रकरणात रुपाली चाकणकर यांना सहआरोपी करण्यासाठी पोलिसांच्या नाकदुऱ्या काढत आहे. अशा दुटप्पी वागण्यालाच "भोंदूगिरी" म्हणतात ना?

अटकेच्या बेड्या पाठलाग करू लागल्या, तसा मनोहरमामा आपण बाळूमामांचा 'अवतार' नसून त्यांचा 'भक्त' असल्याचे सांगू लागला. आपण फक्त आयुर्वेदिक औषधं द्यायचो आणि ज्योतिष सांगून लोकांच्या अडचणी सोडवायचो, त्यांची संकटं टाळायचो,असं सांगू लागला. तथापि, ज्याला स्वतःच्या अर्धांगवायू पीडित आईवर औषधोपचार करता आले नाहीत; तो कर्करोगग्रस्तावर काय उपचार करणार? ज्याला स्वतःवरचे बदनामीचे संकट समजू शकत नाही; तो दुसऱ्याचे ज्योतिष-भविष्य काय सांगणार?

अर्थात,असे प्रश्न देव-धर्म-भक्ती, अध्यात्म, सत्संग-माहात्म्य यांचे 'गिऱ्हाईक' झालेल्या लोकांना पडत नाहीत. बुद्धी गहाण ठेवून ते स्वतःच्या उमेदीची, पैशाची, इज्जतीची लुटमार करवून घेण्यासाठीच जणू सिद्धपुरुषाच्या किंवा अवतारमूर्तीच्या शोधात असतात. अशामुळेच विचित्र- विक्षिप्त वागणारे बाळूमामासारखे 'संत' होतात आणि त्यांच्या 'संत'पणाचा फायदेशीर गवगवा होऊ लागला की, त्यांतून तुरुंगात जाण्याचा चमत्कार घडवणारे 'मनोहरमामा' सारखे अवतार निपजतात!

अवतारांच्या ह्या बनवाबनवीत श्री कृष्ण, विष्णू, दत्त, कालिमाता, साईबाबा यांची विशेष चलती आहे. अधूनमधून भक्तमंडळी 'नरेंद्र मोदी विष्णू अवतारी'असल्याची बोंब ठोकतात. पण त्याने मोदीजी जसोदाबेनला 'लक्ष्मी'चा मान देत नसल्याने अशी बोंब वाया जाते. ही उणीव राहू नये, यासाठी अनिरुद्ध जोशी तथा 'बापू'ने साईबाबांच्या अवतारातून विष्णूच्या अवतारात जाताना, आपल्या पत्नी नंदा यांना 'लक्ष्मी'च्या आणि बापूगिरीचा उद्योग सांभाळणाऱ्या- वाढवणाऱ्या सुचितदादा वैद्य याला 'शेषनाग'च्या अवतारात आणण्याची काळजी घेतली होती. त्याआधी बापू शिर्डीच्या साईबाबाच्या अवतारात होता. तर रत्नागिरीतला श्रीकृष्ण पाटील स्वामी समर्थांच्या अवतारात प्रकटला. त्याने स्वामींच्या बखरीचा अभ्यास केला असल्यामुळे तोही त्यांच्यासारखाच अश्लील शिव्या देऊ लागला. अशाप्रकारे एका महिलेला शिव्या देतानाचा व्हिडिओ कल्याण येथील अमित पारकर यांनी "सोशल मिडिया" टाकला. त्यानंतर "स्वामी समर्थ अवतारी" श्रीकृष्ण पाटलाच्या अनेक भानगडी पुढे आल्या. त्याची नोंद घेऊन (सप्टेंबर २०१७ मध्ये) त्याला पोलिसांनी अटक केली होती.

श्रीकृष्णाच्या अवतारात जाऊन छिनालपणा करणारे आणि दत्तावतारातून योनीपूजा उरकणाऱ्या बुवा- महाराजांची महाराष्ट्रात कमी नाही. गगनगिरी महाराज हे नाथपंथी हटयोगी! माशांनी पाय कुरतडून खलास करेपर्यंत त्यांनी जलतपस्या केली होती. अशी कोणतीही तपस्या न करता आणि ते हयात असताना दत्ताजी शिंदे नावाच्या बनेल बुवाने पुण्यात धनकवडी येथे "गगनगिरी अवतारी दत्ताजी शिंदे महाराज मठ" काढून, तो लोकांना तोडगे सांगू लागला. तांत्रिक विधीसाठी लोकांना स्वतःच्या पतपेढीतून कर्ज काढायला लावून, त्या पैशावर हात मारून होमात जाळू लागला. (त्याच्या करमतींचा तपशील बराच आहे.) त्याची ही आपल्या नावाने चाललेली लुटमार 'दिव्यदृष्टी' प्राप्त झालेल्या गगनगिरी महाराजांना समजली नाही. (हा मोठा साक्षात्कार!) ती पुण्यातले 'अंधश्रद्धा निर्मूलक' श्री. तरटे यांना समजली. त्यांनी दत्ताजी शिंदेचा "गगनगिरी अवतार-बाजार" उठवला. ह्या भामट्या अवताराची सुकन्या कोण आहे, ते नाशिक कोर्टात लंपट अशोक खरातला आणल्यावर, "आमच्या ताब्यात द्या" म्हणून पोलिसांच्या गराड्यात मीडिया कॅमेऱ्यांकडे लक्ष ठेवून झटापट करणाऱ्या तृप्ती देसाई यांनी सांगावं.

असाच प्रकार, परभणी व अमेरिकेत उपपीठ स्थापन करून 'जगद्गुरू' रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज म्हणून मिरवणाऱ्या नाणीज- रत्नागिरीच्या जगदीश सुर्वे याने सुरुवातीला (१९९६ मध्ये) काडसिद्धेश्वर महाराजांचा अवतार घेऊन केला होता. तेव्हा नरेंद्र महाराज भक्ताना "प्रसाद" कानाखाली आवाज काढून द्यायचा. पण ९६ वर्षांच्या काडसिद्धेश्वर महाराजांनी "मी हयात असताना, माझा अवतार घेणारा हा बुवा कोण?" असे म्हणत नरेंद्र महाराजांच्याच कानाखाली आवाज काढला. त्यानंतर त्याचे 'कानफोड्या प्रसाद' देणे बंद झाले. मग तो काही काळसाठी शेगावच्या गजानन महाराजांचा अवतार झाला.

अशाच प्रकारे नवी मुंबई जवळच्या पनवेल रेल्वे स्थानकाजवळ बाबा नारायण भगवती अय्यर ऊर्फ नारायण बाबा याने आपलं 'साई अवतारी' साम्राज्य उभं केलं. तो रेल्वेत 'गार्ड' होता. त्यापूर्वी तो धार्मिक- आध्यात्मिक शिक्षणासाठी अलाहाबादला गेला. तिथून तो २२ व्या वर्षी परतला. तेव्हा त्याला एक 'योगिनी' भेटली. तिने त्याचा 'साई अवतार' ओळखला. तोपर्यंत त्याला शिर्डीचे साईबाबा ठाऊक नव्हते. तो शिर्डीला गेला आणि साईबाबांचे माहात्म्य समजून घेतले. त्यानंतर त्याने आपल्या 'साई अवतार स्पेशल'ला हिरवा बावटा दाखवला. स्वतःच संस्थापक, चालक-मालक, विश्वस्त असलेल्या 'भगवती साई संस्थान' आणि 'नारायण बाबा चॅरिटेबल ट्रस्ट' तर्फे त्याने 'साक्षात साईस्वरूप, अनंतकोटी ब्रह्माण्डनायक, वेदरक्षक, विप्रपूजक (विप्र = ब्राह्मण), धर्मरक्षक, गोरक्षक, अवतारपुरुष,' अशा २३ पदव्या लावून घेत अखेरीस तो 'श्रीश्रीश्री जगद्गुरू श्री साई नारायण महाराज' झाला.

दोन ट्रस्टच्या माध्यमातून त्याने साईबाबांच्या नावाचा वापर करून अंधश्रद्धांना चालना कशी दिली? दिल्ली-नोयडा आणि शिर्डीमध्ये बेनामी जमीन कशी घेतली? पनवेलमधील दोन बड्या इलेक्ट्रॉनिक्स व्यवसायात व्याजाने पैसा कसा गुंतवला? ह्या प्रश्नांची उत्तरे देणारे लेखन पनवेल येथील 'योद्धा' पत्रकार सुधाकर लाड यांनी 'साईलीला' नियतकालिकातून केले आहे. इतक्यावरच ते थांबले नाही. तर त्यांनी 'माहिती अधिकार'चा वापर करून 'नारायण बाबा ट्रस्ट'च्या माध्यमातून करीत असलेल्या भ्रष्ट व्यवहाराचाही तपशील जमवला. तो भयानक आहे. ह्या 'साईस्वरूप' नारायण बाबाचं 'कोरोना'ने निधन झाले! पण अशा बनावट अवतारांचे गिऱ्हाईक होणे बंद झालेले नाही; ह्याची ताजी साक्ष "कृष्णावतारी" अशोक खरात आणि "शंकरावतारी" ऋषीकेश वैद्य यांनी दिलीय. ह्यामुळे काय दिसते? तर –

बुवाबाजी भुलवी जना।
भ्रष्ट करी लोकजीवना।
फसवुनी भोळ्या-बापड्यांना।
भलत्या छंदा लावती॥

अशी बुवाबाजीची चिरफाड करणाऱ्या संत तुकडोजी महाराजांनी त्यांच्या 'ग्राम-गीता' मधून संत चमत्कारांचा समाचार घेताना कळवळून सांगितले आहे –

चमत्काराच्या भरी भरोनी।
झाली अनेकांची धूळधाणी।
संत-अवतार यापुढे कोणी।
नका वर्णू सज्जन हो॥

ह्याचा अर्थ, हे बुवाबाजीच्या नादाला लागतात, ते नक्कीच सज्जन नाहीत!

पान १ वरून

## सोलापूर जिल्ह्यात पेट्रोल...

प्रमाणात उपलब्ध आहे. तरी नागरिक, शेतकरी व व्यापारी यांनी पेट्रोल, डिझेलचा आवश्यकतेप्रमाणे वापर करावा, परंतु त्याचा अवैध साठा करू नये. असा इंधनाचा साठा करणाऱ्या संबंधितावर प्रशासन कठोर कारवाई करणार आहे, असे ही सूचित करण्यात येत आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील नागरिकांना इंधन पुरवठ्याबाबत कोणतीही अडचण येणार नाही, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## तत्कालीन आयुक्तांवर...

नसता, असे मत व्यक्त केले. नगरसेवक अनंत जाधव यांनी या प्रकरणामुळे शहराची प्रतिमा मलिन झाल्याचे सांगत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली.

दरम्यान, संजय कोळी, शिवाजी वाघमोडे, दीपक जमादार व रवी कैय्यावाले यांनी आक्रमक भूमिका घेत तत्कालीन आयुक्तांवर गुन्हा दाखल करण्यासाठी प्रशासकीय प्रस्ताव मांडण्याच्या सूचना दिल्या. सदस्यांच्या प्रश्नांना उत्तर देताना अधिकारी तपन डंके यांची मात्र कोंडी झाली. पीएम ई-बस योजनेअंतर्गत येणाऱ्या नवीन बससंदर्भातही सभागृहात चर्चा झाली.

दरम्यान, शिक्षण विभागाच्या चर्चेदरम्यान मनपा शाळांमधील विद्यार्थी पटावर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले. नगरसेविका रोहिणी तडवळकर व संगीता जाधव यांनी विद्यार्थी पट वाढवण्यासाठी विविध सूचना मांडल्या. नगरसेवक सत्यजित वाघमोडे यांनी प्रभाग क्र. 23 मधील शैक्षणिक परिस्थितीकडे लक्ष वेधले. या प्रभागात मोठ्या प्रमाणावर इंग्रजी माध्यमाच्या खासगी शाळा असून, त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात डोनेशन आकारले जात असल्याने सर्वसामान्य कुटुंबांना ते परवडत नसल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे गुणवत्तापूर्ण व परवडणाऱ्या शिक्षणासाठी शासकीय स्तरावर आधुनिक शाळांची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## 6 वर्षीय चिमुकल्याचे...

टाकण्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. त्यामुळे, शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांचा हलगर्जीपणा पुन्हा एकदा पुढे आला आहे. शाहू सुनील दंदाडे या सहा वर्षीय मुलाला दोन्ही हाताला सहा बोटे आहेत. त्यातील उजव्या हाताचे बोट दुखत असल्याने ते काढून टाकण्याचा निर्णय डॉक्टरांच्या सल्ल्यानंतर घेण्यात आला होता. या शस्त्रक्रियेसाठी मुलगा उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल होता, दरम्यान चिमुकला मुलगा डॉक्टरांना कोणतं बोट काढायचं हे सांगत असतानाही त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करुन उजव्या ऐवजी डाव्या हाताचे बोट डॉक्टरांकडून काढण्यात आल्याची तक्रार दंदाडे कुटुंबीयांनी रुग्णालय प्रशासनाकडे केली आहे. याबाबत चौकशी समिती नेमण्यात आली असून समितीच्या अहवालानंतर, कुणीही दोषी आढळल्यास योग्य ती कारवाई करणार असल्याचे वैद्यकीय अधीक्षकांकडून सांगण्यात येत आहे. मात्र, उजव्याऐवजी डाव्या हाताचे बोट काढल्याच्या आरोपामुळे उपजिल्हा रुग्णालयातील नवीन प्रताप समोर आला आहे.

## वात्रटिका

### गुंतले गुंत्यात

ते युद्धात गुंतले आणि
आम्ही राजकारणात...
दोन्हीत नको गुंतायला ते
गुंतले बुवा बाया लफड्यात...
प्रयत्नवादी सगळेच आहेत
कोणालाच कसली उसंत नाही...
पुरानात झाले तेवढेच खरे
आजकाल कोणी संत नाही...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

## सार्वजनिक जाहीर नोटीस
### (कागदपत्रे हरविल्याबाबत)

सर्वसाधारण जनतेस कळविण्यात येते की, जहिरुद्दीन नजरुद्दीन नाईकवाडी यांचे कडून बेबी भारत मांजरे यांनी खरेदी केलेला नाईकवाडी प्लॉट,परांडा रोड,बार्शी, तालुका बार्शी, जिल्हा सोलापूर येथील विभाग क्र.20 मधील जुना गट नं 919/27 याचा नवीन गट नं 925/27 भाग नं 26 क्षेत्रफळ 1140 चौ फूट म्हणजे 106 चौ.मी. असलेल्या स्थावर मालमत्तेसंबंधित मूळ कागदपत्रे बार्शी बसस्थानक परिसरात प्रवासादरम्यान हरवली/चुकून हरवली असून, ती शोधण्याचा पूर्ण प्रयत्न करूनही मिळून आलेली नाहीत.

याबाबत सदर मालमत्ताधारक श्री. शब्बीर अजमोद्दीन शेख यांनी दिनांक 29/03/2026 रोजी बार्शी शहर पोलीस स्टेशन,बार्शी येथे हरविलेल्या कागदपत्रांबाबत ऑनलाइन तक्रार नोंदविली आहे.

हरविलेल्या मूळ कागदपत्रांची यादी खालीलप्रमाणे आहे:
1. Sale Deed क्र. 1270 वर्ष 2008

वरील सर्व कागदपत्रे मूळ स्वरूपात हरवली आहेत.

जर कोणास वरील कागदपत्रे मिळून आली तर कृपया खाली नमूद केलेल्या पत्त्यावर सुपूर्द करावीत किंवा खालील सहीदाराशी संपर्क साधावा. तसेच सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, सदर कागदपत्रांचा कोणत्याही प्रकारे गैरवापर करू नये.

तसेच, कोणास सदर कागदपत्रे किंवा संबंधित मालमत्तेबाबत कोणताही हक्क, दावा किंवा हरकती असल्यास त्यांनी या जाहीर नोटीसच्या प्रसिद्धीपासून 7 (सात) दिवसांच्या आत खाली सहीदार वकिलांकडे लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा कोणताही दावा/हरकत नाही असे गृहीत धरून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक: 29/03/2026
ठिकाण: बार्शी ता.बार्शी

ॲडव्होकेट
**तांबोळी इस्माईल चांदसाहेब**
(बी एस्सी, एल.एल.बी.बी एड,एम.एड)
दिवाणी व फौजदारी न्यायालय,बार्शी.
तालुका- बार्शी जिल्हा सोलापूर
पिन 413411
मोबा.: 9689903001

## PUBLIC NOTICE
### (Lost Documents)

It is hereby notified to the general public that the original documents related to the immovable property purchased by Baby Bharat Manjre from Jahiruddin Naziruddin Naikwadi, situated at Naikwadi Plot, Paranda Road, Barsi, Taluka Barsi, District Solapur, Section 20, Old Survey No. 919/27, New Survey No. 925/27, Part No. 26, Area 1140 sq. ft. (106 sq. meters) have been lost/misplaced near Barsi Bus Stand during travel. Despite efforts, the documents could not be traced. The owner, Mr. Shabbir Azmoddin Sheikh, has lodged an online complaint with Barsi City Police Station, Barsi on 29/03/2026 regarding the lost documents.

The list of lost original documents is as follows:

1. Sale Deed No. 1270 of 2008 and all related documents.

If anyone finds the above documents, please return them to the address mentioned below or contact the undersigned. The general public is requested not to misuse these documents in any way.

Anyone with any claim, right, or objection regarding the documents or property should notify the undersigned advocate in writing within 7 (seven) days from the publication of this notice. Otherwise, it will be assumed that there are no claims/objections, and further legal proceedings will be undertaken.

Date: 29/03/2026
Place: Barsi, Taluka Barsi

**Advocate**
**Tambolee Ismail Chandsaheb**
((link unavailable), LL.B., B.Ed., M.Ed.)
Civil and Criminal Court, Barsi
Taluka - Barsi, District Solapur
Pin 413411
Mobile: 9689903001

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन जनजागृती कार्यक्रम संपन्न




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव येथे आपत्ती व्यवस्थापन जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. प्रथम वर्ष अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी आयोजित या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. नवले होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सोलापूरचे संचालक शक्तीसागर ढोले उपस्थित होते. तसेच महाराष्ट्र इमर्जन्सी मेडिकल सर्व्हिसचे प्रोजेक्ट हेड डॉ. कौस्तुभ घाटुळे यांच्यासह शुभांगी गवते, रामचंद्र वाघमारे, बजरंग होटकर, सागर धप्पाधुळे आणि पूजा सपकल हे मान्यवर उपस्थित होते. त्यांच्यासोबत जिल्ह्यातील आपदा मित्रांची उपस्थिती होती. त्यांनी प्रात्यक्षिके द्वारे घ्यावयाची काळजी समजावून सांगितले.

हा कार्यक्रम कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाचे समन्वयक सचिन घाडगे यांनी प्रस्ताविकात कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. सूत्रसंचालन कु. मानसी जाधव यांनी केले.

प्रमुख पाहुणे शक्तीसागर ढोले यांनी आपत्ती काळात घ्यावयाच्या प्राथमिक खबरदारी, बचावकार्याची पद्धत आणि नागरिकांनी दाखवायची सजगता याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. कौस्तुभ घाटुळे यांनी आपत्कालीन वैद्यकीय सेवांचे महत्त्व व तात्काळ प्रतिसाद यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

'आपदा मित्र' संकल्पनेअंतर्गत प्रशिक्षित स्वयंसेवकांची भूमिका किती महत्त्वाची आहे, यावरही त्यांनी प्रकाश टाकला.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. के. एस. पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाबाबत जागरूकता निर्माण होऊन आपत्कालीन परिस्थितीत योग्य प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी ॲड. अमृता नागनाथ वाघे यांची निवड

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** स्मृतीशेष कृष्णात दादा बोबडे यांच्या सामाजिक व राजकीय विचारांचा वारसा आज नव्या उंचीवर पोहोचल्याचे चित्र जिल्ह्यात पाहायला मिळाले. त्यांच्या स्वप्नांना साकार रूप देत, योगेश कृष्णात बोबडे व सुरजा योगेश बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली ॲड. अमृता नागनाथ वाघे यांनी जिल्हा परिषदेमधील महिला व बालकल्याण समितीच्या सभापती पदाकडे यशस्वी आगेकूच करत मानाची निवड मिळवली आहे.

कृष्णात दादा बोबडे यांनी आपल्या संपूर्ण राजकीय प्रवासात सर्वसामान्य जनतेच्या हिताला प्राधान्य दिले. समाजातील दुर्बल घटक, शेतकरी, महिला आणि युवक यांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. विकासाभिमुख दृष्टीकोन, सर्वसमावेशक विचारसरणी आणि जनतेशी घट्ट नाळ असलेले नेतृत्व यामुळे त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. विशेष म्हणजे, महिलांनी राजकारणात पुढे यावे, नेतृत्व स्वीकारावे, यासाठी त्यांनी नेहमीच प्रोत्साहन दिले. त्याच विचारांची प्रेरणा घेऊन सुशिक्षित व उच्चविद्याविभूषित ॲड. अमृताताई वाघे यांची झालेली निवड ही केवळ एका पदाची निवड नसून, कृष्णात दादा बोबडे यांच्या कार्यपद्धतीचा आणि विचारांचा पुढील टप्पा मानला जात आहे. त्यांच्या निवडीमुळे महिला सक्षमीकरणाला



नवे बळ मिळणार असून, जिल्हा परिषदेमध्ये महिला व बालकल्याण क्षेत्रात अधिक प्रभावी आणि लोकाभिमुख कामकाज होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या निवडीमुळे बोबडे गट पुन्हा एकदा सामाजिक परिवर्तनाची नवी दिशा घेऊन पुढे सरसावला असल्याचे स्पष्ट झाले आहे. ग्रामीण भागातील महिला, बालक आणि कुटुंबांच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस योजना राबवण्यावर भर दिला जाईल, असे संकेतही मिळत आहेत. दरम्यान, या ऐतिहासिक निवडीमुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध स्तरातून ॲड. अमृता नागनाथ वाघे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या माध्यमातून जनतेच्या अपेक्षांना न्याय देणारे काम घडेल, तसेच कृष्णात दादा बोबडे यांच्या विचारांचा वारसा अधिक व्यापक स्तरावर रुजेल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.

# जिजाऊ ब्रिगेडचे 3 एप्रिल रोजी मुंबई येथे राज्य महाअधिवेशन





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महिलांचे सामाजिक सांस्कृतिक व वैचारिक विचारपीठ असलेल्या जिजाऊ ब्रिगेड च्या वतीने दिनांक 3 एप्रिल 2026 रोजी राज्यस्तरीय महाअधिवेशन श्री छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिर मुंबई (दादर) येथे आयोजित करण्यात आलेले आहे. या अधिवेशनासाठी महाराष्ट्रासह देशभरातून जवळपास एक हजार महिला पदाधिकारी सहभागी होणार आहेत तसेच प्रत्येक जिल्ह्यातील असंख्य कार्यकर्ते उपस्थित राहणार असून या अधिवेशनातील वैचारिक प्रबोधनाचा व सांस्कृतिक उपक्रमांचा लाभ घेण्यासाठी महाराष्ट्रातील,जिल्ह्यातील तसेच शहरातील महिलांनी उपस्थित राहण्याचे आव्हान जिजाऊ ब्रिगेडच्या शिवमती स्वाती पवार महाराष्ट्र प्रदेश सदस्य यांनी केले आहे. हे महाअधिवेशन एकूण चार सत्रामध्ये पार पडणार असून उद्घाटन म्हणून मुंबई महानगरपालिकेच्या महापौर शिवमती रितूताई तावडे यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्षा शिवमती सीमाताई बोके असणार आहेत.

कार्यक्रम स्थळी विविध सुप्रसिद्ध वक्ते यांचे मार्गदर्शन लाभणार असून अधिवेशनस्थळी जिजाऊ ब्रिगेडच्या स्मरणिकेचे प्रकाशन होणार आहे.

या अधिवेशनासाठी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड पुरुषोत्तम खेडेकर, शिवधर्म संसद सदस्य शिवमती रेखाताई खेडेकर तसेच मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष इंजि.विजय घोगरे, राज्य कार्याध्यक्ष शिवश्री नवनाथ घाडगे प्रदेश महासचिव चंद्रशेखर शिखरे, जिजाऊ ब्रिगेड महासचिव स्नेहाताई खेडेकर आंतरराष्ट्रीय अध्यक्षा मयुराताई देशमुख, राष्ट्रीय अध्यक्ष निर्मलाताई पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या अधिवेशनासाठी जिजाऊ ब्रिगेडच्या राज्य उपाध्यक्ष अंजलीताई भोसले, मुंबई अध्यक्ष स्मिता देसाई, नवी मुंबई अध्यक्ष भारतीताई पाटील, महासचिव सरिताताई सोमवंशी, कार्याध्यक्ष मनीषाताई देसाई, ठाणे जिल्हाध्यक्ष सुनितताई पाटील व मुंबईची सर्व टिम अथक परिश्रम घेत आहेत.

# लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयातर्फे रानमसले येथे आरोग्य तपासणी शिबीर संपन्न



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय वडाळा आणि ग्रामपंचायत रानमसले यांच्या संयुक्त विद्यमाने लोकमंगल जीवन वेदा आयुर्वेदिक हॉस्पिटल यांच्या माध्यमातून लोकमंगल समृद्ध गाव योजना आणि राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत मौजे रानमसले ता. उत्तर सोलापूर येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर राबविण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी रानमसले गावचे सरपंच मनोहर क्षीरसागर, उपसरपंच रमेश सुतार, लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन, लोकमंगल जीवन वेदा आयुर्वेदिक हॉस्पिटलचे डॉ. अमजद बिजापुरे, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा आशिष सरकाळे तसेच गावातील ग्रामस्थ उपस्थित होते. या आरोग्य तपासणी अंतर्गत गावातील नागरिकांना विविध आजारांबाबत मार्गदर्शन करण्यात आले तसेच औषध गोळ्यांची उपलब्धता करून देण्यात आली. या शिबिरात गावातील ज्येष्ठ नागरिकांनी उल्लेखनीय प्रतिसाद नोंदवून शिबिर आयोजनाबाबत समाधान व्यक्त केले.

शिबिरामध्ये एकूण 40 नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. सदरील शिबिराच्या आयोजनासाठी लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन यांचे मार्गदर्शन लाभले. शिबिराच्या संपन्नतेसाठी लोकमंगल जीवनवेदा हॉस्पिटलचे डॉ. अमजद बिजापुरे, सौ मीनाक्षी इंगळे, सौ नंदा पवार आणि रमेश पवार यांचे विशेष सहकार्य लाभले. शिबिराच्या यशस्वी आयोजन व संपन्नतेसाठी सर्व रासेयो स्वयंसेवकांनी मोलाची भूमिका पार पाडली.

## जाहीर प्रसिध्दीकरण

अर्ज नं. /२०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

जोहराब सय्यद साहेब शेख जोहराबी रुस्तम कुरोलीकर (लग्ना नंतरचे नाव) वय -७६ वर्षे. धंदा- गृहिणी रा. कलावती कोतवाल स्कूल जवळ हडपसर पुणे } **अर्जदार**

**विरूद्ध**

मोहोळ नगरपरिषद मोहोळ } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांची जोहराबी सय्यदसाहेब शेख जन्म दि. २४/६/१९४९ रोजी मौजे मोहोळ ता. मोहोळ. जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदारने त्याबदल सदर या मे कोर्टात सामनेवाला यांच्याकडील जोहराबी सय्यदसाहेब शेख यांच्या जन्माबाबतसामनेवाला यांच्या कडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमूद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्याच्या कडील माहे जून १९४९ च्या अभिलेखात अर्जदार यांची जन्म नोद नसल्याचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या. मे कोर्टात सामनेवाला यांच्यकडील आभिलेखात जन्माचीनोंद करून घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि. १३/४/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत मे कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता. २७/३/२०२६

**हुकूमावरुन**

## जाहीर प्रसिध्दीकरण

अर्ज नं. /२०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

रुक्साना हुमायून हरणमारे शबाना शब्बीर शेख (लग्ना नंतरचे नाव) वय - ४४ वर्षे. धंदा - गृहिणी रा. इंदापूर जि. पुणे } **अर्जदार**

**विरूद्ध**

मोहोळ नगरपरिषद मोहोळ } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांची रुक्साना हुमायून हरणमारे जन्म दि.१/६/१९८२ रोजी मौजे मोहोळ ता. मोहोळ. जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदारने त्याबदल सदर या मे कोर्टात सामनेवाला यांच्याकडील रुक्साना हुमायून हरणमारे यांच्या जन्माबाबतसामनेवाला यांच्या कडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमूद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्याच्या कडील माहे जून १९८२ च्या अभिलेखात अर्जदार यांची जन्म नोद नसल्याचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या. मे कोर्टात सामनेवाला यांच्यकडील आभिलेखात जन्माचीनोंद करून घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि. १३/४/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत मे कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता. २७/३/२०२६

**हुकूमावरुन**

## ग्रामपंचायत ढवळस ता.माढा जि.सोलापूर

**टेंडर नोटीस**

ग्रामपंचायत ढवळस,ता.माढा,यांचेकडून खालील कामे करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून बंद लखोट्यात निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाना रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | जि.प. शाळा गावठाण बोअर व मोटार घेणे. | २,००,००० | २००० | २०० | ३ महिने | खुला |
| २) | पा.पु. नवीन व साहित्य व दुरुस्ती. | २,००,००० | २००० | २०० | ३ महिने | खुला |
| ३) | जि.प.शाळा ठोंबरे वस्ती पा.पु. सोय करणे. | १,००,००० | १००० | २०० | ३ महिने | खुला |
| ४) | सर्व शाळा व अंगणवाडी येथे वॉश बेसिन व इतर सोय करणे. | २,००,००० | २००० | २०० | ३ महिने | खुला |

टीप: १)कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि.३०/०३/२०२६ स.१०.०० पासून २)भरलेल्या निविदा स्वीकारण्याचा दि.०४/०४/२०२६ सायं ५.०० वा पर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय ढवळस ३)निविदा उघडणेचा दि.०६/०४/२०२६ रोजी स. १०.०० वाजता ४)निविदे संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ व २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. ५)निविदा मंजूर,नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.सरपंच यांना राखुन ठेवला आहे.निविदा फॉर्म सुट्टीचे दिवस वगळून मिळतील व स्वीकारले जातील.

सही/- ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत
ढवळस,ता.माढा,जि.सोलापूर

शिक्का

सही/- सरपंच
ग्रामपंचायत ढवळस,
ता.माढा,जि.सोलापूर

## ग्रामपंचायत फुटजवळगाव ता.माढा जि.सोलापूर

**टेंडर नोटीस**

ग्रामपंचायत फुटजवळगाव,ता.माढा,यांचेकडून खालील कामे करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून बंद लखोट्यात निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाना रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | मौजे फुटजवळगाव गाव अंतर्गत रस्ता करणे- सीना माढा रोड ते शिवाजी साळुंखे वस्ती रस्ता खडीकरण करणे. | २,९९,८६८ | ३००० | ३०० | ६ महिने | खुला |

टीप: १)कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि.३०/०३/२०२६ स.१०.०० पासून २)भरलेल्या निविदा स्वीकारण्याचा दि.०४/०४/२०२६ सायं ५.०० वा पर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय फुटजवळगाव ३)निविदा उघडणेचा दि.०६/०४/२०२६ रोजी स. १०.०० वाजता ४)निविदे संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ व २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. ५)निविदा मंजूर,नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.सरपंच यांना राखुन ठेवला आहे.निविदा फॉर्म सुट्टीचे दिवस वगळून मिळतील व स्वीकारले जातील.

सही/- ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत
फुटजवळगाव,ता.माढा,जि.सोलापूर

शिक्का

सही/- सरपंच
ग्रामपंचायत फुटजवळगाव,
ता.माढा,जि.सोलापूर


## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय

**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)


### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड**
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779



**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# आरोग्य व्यवस्थेत नैतिकतेचा पाया भक्कम करणे ही काळाची गरज

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** आरोग्य व्यवस्थेत नैतिक मूल्यांची जपणूक ही काळाची गरज असल्याचा संदेश 'मेडिकल इथीक्स इन इंडिया' या विषयावरील चर्चासत्रातून देण्यात आला. रुग्णांचा विश्वास वाढवण्यासाठी आणि उपचार प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी डॉक्टरांनी नैतिकतेला प्राधान्य द्यावे, असे मत तज्ज्ञांनी यावेळी व्यक्त केले.

मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथील 'पल्स वैद्यकीय परिषद २०२६' परिषदेत आयोजित केलेल्या या चर्चासत्रात ॲडव्होकेट आणि मेडिकोलीगल एक्सपर्ट डॉ. गोपीनाथ एन. शेनॉय आणि मेडिकोलीगल कन्सल्टंट व हॉस्पिटल ॲडमिनिस्ट्रेटर डॉ. सुगंथा अय्यर यांनी सहभाग घेतला. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे प्रशासक डॉ. विंकी रुघवानी हे या सत्राचे समन्वयक होते. यावेळी ॲडव्होकेट आणि मेडिकोलीगल तज्ज्ञ डॉ. गोपीनाथ एन. शेनॉय यांनी सांगितले की, वैद्यकीय क्षेत्रात वाढते तंत्रज्ञान आणि गुंतागुंतीच्या उपचारपद्धती लक्षात घेता डॉक्टरांनी कायदेशीर नियम आणि नैतिक निकष यांची सखोल माहिती ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. रुग्णाची संमती योग्य पद्धतीने नोंदवणे, उपचारांची स्पष्ट माहिती देणे आणि पारदर्शक संवाद ठेवणे यामुळे भविष्यातील वाद टाळता येऊ शकतात. मेडिकोलीगल कन्सल्टंट आणि रुग्णालय प्रशासक डॉ. सुगंथा अय्यर यांनी रुग्ण-डॉक्टर नात्यातील विश्वासाचे महत्त्व अधोरेखित केले. रुग्णाला समजेल अशा भाषेत आजार, उपचार आणि जोखीम समजावून सांगणे ही डॉक्टरांची नैतिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच रुग्णाच्या स्वायत्ततेचा आदर, गोपनीयता राखणे आणि रुग्णहिताला प्राधान्य देणे आवश्यक असल्यावर त्यांनी भर दिला.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) उमेदवाराचा आश्वासनांचा जाहीरनामा २) दुष्काळात प्रत्येकाला रोजगार मिळण्यासाठी शासन चालवत असलेली योजना-**** ** योजना ३) लाभ, उपयुक्त ४) नशीब (हिंदीत) ५) राहुल गांधी यांच्या बहिणीचे नाव ६) स्त्रियांना कपाळभर लावलेले कुंकू ७) येणाऱ्या काळात ११) गडबड, धांदल १२) भय, भीती (हिंदीत) १३) फटाक्यांची माळ १५) विमान उतरण्याची जागा १८) मुख्याध्यापक २०) हात, टॅक्स २१) बाहेरच्या विरूध्दार्थी २३) दुप्पट (इंग्रजीत) २४) मजबूत, कणखर २५) विचार, निर्धार (हिंदीत) २९) एक जगप्रसिध्द धरण कालवा ३०) सायकलचे चाक ३१) मत देण्याची क्रिया ३२) कामाचा मिळणारा आर्थिक मोबदला ३४) सलमान खानच्या बंधूचे नाव ३५) मराठी चित्रपटसृष्टीतील एक अभिनेता-*** भावे ३८) मनसे अध्यक्ष-** ठाकरे ३९) दु:ख (हिंदीत) ४०) कावळ्याचे ओरडणे **काव ४२) याच्या पिठापासून चपाती अथवा पोळी करतात

**आडवे शब्द :** १) खा. राहुल गांधी यांचे भाजपमध्ये असलेले चुलतबंधू २) आमदार असलेले पवारांचे नातू-*** पवार ५) पंकजा मुंडे यांच्या खासदार असलेल्या बहिणीचे नाव ७) एक हिंदी भाषिक न्यूज चॅनल ८) तीन गुणिले तीन ९) छ. शिवरायांना राज्याभिषेक करणारे धर्मगुरू-** भट्ट १०) गायीचे वासरू १३) छगन भुजबळ यांचे एक पुतणे १४) भारतीय क्रिकेट संघातील एक माजी खेळाडू -** शास्त्री १६) नाला १७) सासरच्या विरूध्दार्थी १९) पाकचा एक माजी फलंदाज-इंझमाम उल ** २१) दंगल चित्रपटातील प्रमुख अभिनेता २२) पुसटच्या विरूध्दार्थी २५) बिल्डिंग (मराठीत) २६) याच्यावर भाकरी भाजतात २७) णब उलट लिहा २८) बरोबर, योग्य २९) वास, गंध ३२) धनी ३३) दरवाजा ३४) उमेदवाराने डिपॉझिट म्हणून भरलेली रक्कम (मराठीत) ३५) मुलाची पत्नी ३६) कपडे धुण्याची प्रसिध्द पावडर ३७) रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ३८) क्रोध, संताप ४०) श्रवणेंद्रिय ४१) मेंढीपालन करणारा समाज, सरकारने यांच्या आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित ठेवला आहे ४३) वस्तूंची एकत्र केलेली जुळवाजुळव ४४) तूप (हिंदीत)

## सुडोकु - 213

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | | | 2 | | 4 |
| | | 7 | 5 | 8 | 6 | 9 | 1 | 3 |
| | 1 | | 3 | | | | | 7 |
| | 3 | | 6 | 5 | | 4 | 7 | 9 |
| | | 8 | 7 | | 3 | | 6 | 2 |
| | | | 2 | | | 5 | | 8 |
| 8 | 7 | | | | | | | |
| | 4 | 9 | | 1 | | | 2 | |
| 2 | 5 | | 4 | | | 8 | 9 | |

# कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी खा. शिंदे यांचे कृषिमंत्री चौहान यांना निवेदन



**नवी दिल्ली, (वृत्त सेवा):-** सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांची नवी दिल्ली येथे प्रत्यक्ष भेट घेऊन कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत कांदा उत्पादक शिष्टमंडळासोबत निवेदन सादर केले.

यावेळी त्यांनी सोलापूरसह महाराष्ट्रातील शेतकरी सध्या तीव्र आर्थिक संकटाला सामोरे जात असल्याचे निदर्शनास आणून दिले. सध्या कांद्याला मिळणारा बाजारभाव उत्पादन खर्चापेक्षा खूपच कमी असून, शेतकऱ्यांना प्रति क्विंटल केवळ ७०० ते १००० रुपये दर मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून त्यांच्या उपजीविकेवर गंभीर परिणाम झाला आहे. ही परिस्थिती तातडीने हाताळण्याची गरज असल्याचे खासदार प्रणिती शिंदे यांनी स्पष्ट केले.

जागतिक घडामोडी आणि केंद्र सरकारच्या अपुऱ्या निर्यात धोरणांमुळे कांदा निर्यात घटली असून, बाजारातील मागणी कमी झाली आहे. परिणामी शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली असून अनेक शेतकरी अडचणीत सापडले आहेत, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले.

या पार्श्वभूमीवर खासदार प्रणिती शिंदे यांनी कृषिमंत्र्यांकडे ठोस मागण्या मांडल्या.

- शेतकऱ्यांकडून कांद्याची थेट खरेदी करून हमीभाव द्यावा, खरेदी शक्य नसल्यास प्रति क्विंटल किमान 1000 रुपयांचे थेट अनुदान (DBI) देण्यात यावे,
- तसेच कांदा निर्यात तातडीने सुरू करून बाजारभाव स्थिर ठेवण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली.काँग्रेस पक्ष शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ठाम असून, केंद्र सरकारने तात्काळ निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे केली.

यावेळी रणजीत पाटील, महेश चव्हाण, शेखर पाटील आदी उपस्थित होते.

# मराठा सेवा संघाची कक्षा व्यापक करा- प्रदेश महासचिव चंद्रशेखर शिखरे




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा सेवा संघ हा समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी कार्यरत असलेल एक प्रभावी संघटन असून, समाज बांधवांना एकत्र आणून त्यांची प्रगती साधणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन प्रदेश महासचिव चंद्रशेखर शिखरे यांनी केले.

सोलापूर येथे शनिवारी पार पडलेल्या केंद्रीय कार्यकारणी सोलापूर शहर–जिल्हा व पंढरपूर विभागाच्या संयुक्त बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत संघटनेच्या विस्तारावर विशेष भर देण्यात आला. विविध स्तरातील समाज बांधवांना संघटनेशी जोडून मराठा सेवा संघाची कक्षा अधिक व्यापक करण्याचे आवाहन शिखरे यांनी केले. तसेच, संघटनेच्या कार्याला अधिक गती देण्यासाठी दर महिन्यांला नियमित बैठक घेण्याचा निर्णयही सूचित केला.

शिखरे यांनी संघटनेमध्ये सक्षम, सक्रिय व समर्पित पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करून समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोच वाढवणे आवश्यक असल्याचे सांगितले. समाजातील प्रश्न जाणून घेऊन त्यावर ठोस उपाययोजना करणे ही संघटनेची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी समाजात निर्माण होत असलेल्या विवाह जुळवणीतील अडचणी व विवाहानंतर उद्भवणाऱ्या समस्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहून त्यावर मार्ग काढण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून ठोस पावले उचलण्याची गरज व्यक्त करण्यात आली. प्रदेश उपाध्यक्ष संदीपान जाधव यांनी सेवा संघाच्या बचत गटातील जालना जिल्ह्याची यशोगाथा सांगितली तर नेताजी गोरे यांनी सोलापूर जिल्हा मराठा सेवा संघाच्या वाटचालीचा प्रेरणादायी प्रवासाच्या आठवणींना उजाळा दिला. या बैठकीत उपस्थित पदाधिकाऱ्यांना संघटनेच्या कार्याचा आढावा देण्यात आला व आगामी काळातील नियोजनावरही चर्चा झाली. पुणे विभागिय अध्यक्ष प्रशांत पाटील यांनी प्रास्ताविक भाषण केले. या बैठकीस अमित निमकर, जी.के.देशमुख, सदाशिव पवार, उज्वला साळुंखे, सोमनाथ राऊत, दिनेश जगदाळे, प्रकाश ननवरे यांच्यासह सेवासंघाचे, सर्व कक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# माळीनगर गट नंबर दोन येथे श्रीराम नवमी उत्साहात साजरी



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्याच्या पूर्व भागातील माळीनगर गट नंबर दोन येथील श्रीराम मंदिरात रामनवमी मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने उत्साहात गुरुवारी साजरी करण्यात आली. श्रीराम मंदिर समिती व महात्मा फुले गणेशोत्सव मंडळ,गट नंबर दोन यांच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले होते.

श्रीराम नवमी निमित्त श्रीराम मंदिरात बुधवारी रात्री ८ ते १२ वाजेपर्यंत किर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला व गुरुवारी पहाटे ४ ते ६ भजन व काकड आरती घेण्यात आली.त्यानंतर सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत ह. भ. प. प्रकाश शिंदे महाराज यांचे रामायणचार्य फुलांचे कीर्तन झाले आणि त्यानंतर पूजा आणि राजेंद्र गायकवाड,दिलीप इनामके व सारंग भोंगळे यांचे हस्ते आरती करण्यात आली.

गुरुवारी सकाळपासूनच मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. श्रीरामांच्या मूतीर्ची विधीवत पूजा अभिषेक करण्यात आला. श्रीराम च्या घोषणांनी व रामनामाच्या गजराने संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता.

यावेळी दि सासवड माळी शुगर फॅक्टरी चेअरमन राजेंद्र गिरमे, माळशिरसचे गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे, कारखान्याचे माजी संचालक विलास इनामके, दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटीचे व्हा. चेअरमन नितीन इनामके, सेक्रेटरी अजय गिरमे, खजिनदार ज्योतीताई लांडगे, संचालक डॉ. अविनाश जाधव, रत्नदीप बोरावके, कल्पेश पांढरे, दिलीप इनामके, शुगरकेन सोसायटीचे संचालक कुणाल इनामके, विशाल गिरमे, संचालिका विद्या गिरमे,माजी चेअरमन श्रीमती अवंतिका पांढरे, सुबोध गिरमे, पुष्कर इनामके, घनश्याम भोंगळे, राजेंद्र बधे,नागनाथ बधे, राहुल पांढरे, गणेश बोरावके, करण इनामके, बबलू पांढरे, सोहन इनामके, म.फुले पतसंस्थेचे सेक्रेटरी योगेश कचरे, आदी विविध संस्थांचे आजी–माजी पदाधिकारी, म. फुले गणेशोत्सव मंडळाचे सदस्य, कार्यकर्ते,गट नंबर दोन येथील महिला मंडळातील महिलावर्ग, ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमात भजन, कीर्तन आणि पारंपारिक पाळणा सादर करण्यात आला. स्थानिक भजन मंडळांनी सादर केलेल्या भक्ती गीतातून भाविकांना अध्यात्मिक आनंदाचा अनुभव मिळाला. राम जन्म सोहळ्यावेळी भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. यावेळी भक्तांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम शांततेत,शिस्तबद्ध आनंदी वातावरणात पार पडला. श्रीराम नवमी उत्सवामुळे माळीनगर गट नंबर दोन गावात धार्मिक एकात्मता बंधुभाव आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. हा रामनवमीचा उत्सव यशस्वी करण्यासाठी श्रीराम मंदिर समिती व महात्मा फुले गणेशोत्सव मंडळाचे सदस्य व महिला वर्ग यांनी परिश्रम घेतले.

# नातेपुते पोलीस प्रशासनाकडून मुंगी घाटाची पाहणी



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** चैत्र शुद्ध द्वादशीस सोमवार दिनांक ३० मार्च २०२६ रोजी अनेक मानाच्या कावडी खांद्यावर घेऊन हजारोच्या संख्येने भाविक भक्त कोथळे तालुका माळशिरस येथील अवघड व खडा असणाऱ्या मुंगी घाटातून शिखर शिंगणापूर येथील श्री शंभू महादेवाला जल अभिषेक करण्यासाठी जात असतात. त्या अनुषंगाने अकलूज उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके, नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल वायकर, गोपनीय विभागाचे गणेश कापसे तसेच पोलीस कर्मचारी यांनी मुंगी घाटातील पाहणी केली.

चैत्र शुद्ध द्वादशी सोमवार दिनांक ३० मार्च २०२६ रोजी अनेक मानाच्या मोठ्या कावडी मुंगी घाटातून हजारो भाविकांच्या संख्येने शिखर शिंगणापूर येथील श्री शंभू महादेवास जल अभिषेक करण्यासाठी जातात.या कावडींमध्ये सगळ्यात मोठी मानाची कावड सासवड जिल्हा पुणे येथील असते ती भुत्या तेल्याची. या कावडिला दोन मोठे मोठे रांजण लावलेले असतात. ते वर घेऊन जाणे हे तसे कष्टाचे काम. आणि मग ज्याच्या अभिषेकासाठी हे पाणी न्यायचे त्यालाच मदतीला बोलवतात. आणि हाकही हक्काचे माणूस असावे तशी म्हणजे, हे म्हाद्या, धाव, मला सांभाळ अशी. असा सगळा द्राविडी प्राणायाम करत ही कावड वर नेहण्याचा नयनरम्य सोहळा त्या ठिकाणी पार पडत असतो या कावडी मुंगी घाटात चढवत असताना कोणताही दोर न लावत मानवी साखळीचा साह्याने अवघड आसा मुंगी घाट सर केला जातो. हा सोहळा पाहण्यासाठी मुंगी घाटाच्या पायथ्याशी कोथळे गावात तसेच शिखर शिंगणापूर मुंगी घाटावर लाखोच्या संख्येने भाविक भक्त जमा झालेले असतात. मुंगी घाटाच्या वरील भाग घाटमाथा सपाटी हा शिखर शिंगणापूर हद्दीत येत असून मुंगी घाटातील डोंगराचा पूर्ण भाग हा सोलापूर जिल्हा हद्दीत येतो आहे. त्या अनुषंगाने नातेपुते पोलीस प्रशासनाकडून मुंगी घाटातील पहाणी करून त्या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडू नये निसरडा भाग असल्याने घाटातून वर चढत असताना त्या ठिकाणी काय उपाययोजना करता येतील याची पाहणी केली या होणाऱ्या यात्रेसाठी नातेपुते पोलीस प्रशासनाकडून ६ पोलीस अधिकारी ८२ पोलीस अंमलदार ३० होमगार्ड पथकातील कर्मचारी,पोलीस मुख्यालयाकडील १ आरसीपी पथक, तसेच महाराष्ट्र कमांडो फाउंडेशनचे जवान असा बंदोबस्त लावण्यात येणार आसल्याची माहिती नातेपुते पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस अधिकारी विशाल वायकर यांनी दिली. अकलूज उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके यांनी शिखर शिंगणापूर यात्रा बंदोबस्त व कावड यात्रा अनुषंगाने माहिती घेऊन मुंगी घाट येथील तेथील सर्व बाबींची पाहणी करून भाविकांना यात्रा कालावधीत अडचणी येऊ नयेत याकरिता योग्य त्या सूचना देऊन शिखर शिंगणापूर कावड यात्रा अनुषंगाने पुरविण्यात आलेला पोलीस बंदोबस्ताचा आढावा घेतला.

# प्रा. वामसी प्रिथम पिंगाली यांना गणित रत्न २०२६' पुरस्कार जाहीर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गणित क्षेत्रातील सखोल आणि मूळ संशोधनासाठी दिला जाणारा मानाचा ५ वा गणित रत्न २०२६' पुरस्कार बेंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्था (आयएससी), प्रा. वामसी प्रिथम पिंगाली यांना सोलापूर येथे प्रदान केला जाणार आहे. मंगळवार दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी, सकाळी १० वाजता, सोलापूर येथील संगमेश्वर कॉलेजच्या 'कर्मयोगी आप्पासाहेब काडादी सभागृहात' होणार आहे, अशी माहिती लक्ष्मी हायड्रॉलिक्स प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक शरद ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प्रोफेसर ठाकरे गौरव संस्थेतर्फे कार्यक्रम आयोजित केला आहे. यावेळी खा. पद्मश्री ॲड. उज्वल निकम यांच्या हस्ते हा प्रतिष्ठित पुरस्कार पिंगाली यांना प्रदान करण्यात येईल. तसेच खा. निकम यांच्या हस्ते संगमेश्वर कॉलेजच्या नूतन सभागृहाचे उद्घाटनही पार पडणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान लक्ष्मी हायड्रॉलिक्स प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक शरद ठाकरे हे भूषविणार आहेत. याप्रसंगी श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. "गणित रत्न" हा पुरस्कार अत्यंत मानाचा समजला जातो. यामध्ये सन्मानमूर्तीला १ लाख ११ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह आणि मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. प्रा. पिंगाली यांच्या जागतिक स्तरावर नावाजलेल्या गणितीय संशोधनाची दखल घेऊन प्रोफेसर ठाकरे गौरव संस्थेतर्फे त्यांना हा बहुमान प्रदान करण्यात येणार आहे. हा देश स्तरावरील सोहळा प्रथमच सोलापूर येथे आयोजित करण्यात आला आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रथम कुलगुरु व गणितज्ञ प्रा. डॉ. एन. के. ठाकरे यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त २०१३ मध्ये त्यांच्या शिष्य, गणितप्रेमी व सहकाऱ्यांनी एकत्र येऊन "प्रोफेसर ठाकरे गौरव समिती" स्थापन केली. जमा झालेला निधी न स्वीकारता त्यातून आंतरराष्ट्रीय दजार्चा "गणित रत्न पुरस्कार" सुरू करण्याचा आग्रह प्रा. ठाकरे यांनी धरला. त्यानुसार २०२१ मध्ये ट्रस्ट आणि २०२२ मध्ये सोसायटी म्हणून नोंदणीकृत झालेल्या प्रोफेसर ठाकरे गौरव संस्थेमार्फत या पुरस्काराची स्थापना करण्यात आली. गणित रत्न पुरस्कारासाठी उमेदवारांची निवड आंतरराष्ट्रीय स्तरावरील किमान १० नामांकित गणितज्ञांच्या समितीद्वारे केली जाते, ज्यामध्ये परदेशातील तज्ज्ञांचाही समावेश असतो. आतापर्यंत २०२२ मध्ये प्रा. महेश काकडे (आयआयएससी, बेंगळुरू), २०२३ मध्ये प्रा. नीना गुप्ता (आयएसआय, कोलकाता), २०२५ मध्ये प्रा. अपूर्व खरे (आयआयएससी, बेंगळुरू) यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. २०२४ मध्ये योग्य उमेदवार न मिळाल्यामुळे पुरस्कार प्रदान करण्यात आला नव्हता.

या कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक, गणित प्रेमींनी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन गणित रत्न समिती समन्वयक प्रा. बी. एन. वाफरे

आणि लक्ष्मी हायड्रॉलिक्सचे तांत्रिक संचालक आदित्य ठाकरे यांनी केले आहे.

सोलापूर येथील संगमेश्वर कॉलेजमध्ये 'कर्मयोगी आप्पासाहेब काडादी सभागृह बांधण्यात आले आहे. या ठिकाणी सर्व शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध करण्यात आले आहे 400 जणांची आसन व्यवस्था आहे. या नूतन सभागृहाचे उद्घाटनही पार पडणार आहे. या ठिकाणी हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात येत असल्याचा आनंद आहे. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी केले आहे.

# मूलभूत गरजांसाठी मी सदैव तत्पर- डॉ.धवलसिंह मोहिते पाटील



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** ग्रामस्थांच्या मूलभूत गरजांसाठी मी सदैव तत्पर राहीन असे राष्ट्रवादी काँग्रेस पाटीर्चे (अजित पवार गट) नेते डॉ. धवलसिंह प्रतापसिंह मोहिते पाटील म्हणाले.

माळशिरस तालुक्यातील गिरझणी गावातील, साठे वस्ती व हेगडे वस्ती येथे अनेक वर्षांपासून पाणीपुरवठा बंद अवस्थेत होता. बोअरवेल संदर्भात ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते डॉ. धवलसिंह मोहिते पाटील यांच्याकडे तक्रार केली होती. डॉ. धवलदादांनी गिरझणी गावातील ग्रामस्थांच्या तक्रारीची तात्काळ दखल घेत, बोअरमध्ये नवीन मोटार बसवून,पाणीपुरवठा पुन्हा सुरू करून देत शुभारंभ केला.

प्रसंगी डॉक्टर धवलसिंह मोहिते पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पाणीपुरवठा सुरळीत करून, मोटरीचे पूजन करण्यात आले व पाणी पूजनही करण्यात आले.

यावेळी डॉ. धवलसिंह मोहिते पाटील म्हणाले की ग्रामस्थांना पाण्याची सोय करून देणे ही आपली जबाबदारी आहे, आणि पुढेही अशा मूलभूत गरजांसाठी मी सदैव तत्पर राहीन असे म्हणाले. यावेळी त्यांनी हेगडे वस्ती येथे रस्त्याची पाहणी करून पंचायत समितीला सूचना दिल्या.

याप्रसंगी दादासाहेब नामदास, सागर देशमुख,.शंकर चव्हाण, पत्रकार कृष्णा लावंड, सुभाष साठे, बापू साठे विजय लोखंडे सतीश भिंगारदिवे, साधू साठे, हमु साठे, मच्छिंद्र हेगडे, अवि साठे इत्यादी गिरझणी उपस्थित होते.

# अकलूज वीज वितरणकडून बॅकवर्ड सोसायटीत सक्तीची वसूली



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** मार्च एंडिंगची कारणे देत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, अकलूज महावितरण कडून, बॅकवर्ड सोसायटी (डॉ. आंबेडकर नगर अकलूज) येथे पोलीस बंदोबस्ताचा आधार घेत सक्तीची वसुली केली गेली, यामुळे स्थानिक रहिवाशांकडून संताप व्यक्त होताना दिसत आहे.

अकलूज महावितरणकडून वीज पुरवठा देयक, ग्राहकांना 23 मार्चला देण्यात आला.तर देयकाची अंतिम तारीख 1 एप्रिल अशी देण्यात आली आहे, असे असताना वीज वितरण ग्राहकांना कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना अथवा नोटीस न देता, बॅकवर्ड सोसायटी आंबेडकर नगर अकलूज येथे वीज वितरणचे कर्मचारी, पोलीस बंदोबस्तामध्ये येऊन, सक्तीची वसुली करू लागले. काही ग्राहकांचा मीटर काढण्यात आला तर काही ग्राहक कुटुंबप्रमुख बाहेर गावी असताना त्यांचा विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला तर काही ग्राहक यांच्या बरोबर महावितरणचे कर्मचारी बेशिस्तपणे वागले तर काही ग्राहकांना पंधरा मिनिटांचाही अवधी सुद्धा न देता, त्यांचे वीज कनेक्शन बंद करण्यात आले, त्यांचे वीज पुरवठा मीटर काढण्यात आला.

मार्च एंडिंगच्या नावाखाली वीज वितरण कंपनीकडून, कोणत्याही प्रकारची नोटीस न देता, सक्तीची वसुली करणे नियमात बसते का? असा प्रश्न बॅकवर्ड सोसायटीतील रहिवाशांना पडला आहे.

कोणत्याही प्रकारची ग्राहकांना नोटीस न देता अथवा वीज पुरवठा अंतिम देयक 1 एप्रिल 2026 असताना, कशाच्या आधारे बॅकवर्ड सोसायटी आंबेडकर नगर अकलूज येथे सक्तीची वसूली करण्यात आली असाही प्रश्न बॅकवर्ड सोसायटीतील रहिवाशांना पडला आहे.या बद्दल काही ग्राहकांना विचारले असता ते म्हणाले की जशी त्यांनी सक्तीची वसुली केली आहे तसेच समाधानकारक विद्युत पुरवठाही करणे गरजेचे आहे. कारण आंबेडकर नगर परिसरात सतत विद्युत पुरवठा खंडित होतो. जेव्हा जेव्हा कर्मचाऱ्यांना विचारले जाते,तेव्हा तेव्हा ते एकच कारण देतात लिंक गेली आहे. सतत लिंक कोणत्या कारणाने जाते हे विद्युत वितरण अधिकाऱ्यांनी स्पष्ट करणे गरजेचे आहे असा सवाल केला जात आहे.तर बॅकवर्ड सोसायटी मध्ये वीज वितरणकडून झालेल्या प्रकाराची सखोल चौकशी करण्यात येईल का? चौकशीअंती संबंधित अधिकारी कर्मचारी यांचेवरती कठोर कारवाई करण्यात येईल का? याकडे लक्ष लागले आहे.

# बाल महोत्सवामुळे मुला-मुलींच्या व्यक्तिमत्त्व विकासास चालना- जिल्हाधिकारी आशीर्वाद




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** चाचा नेहरू बालमहोत्सव' हा केवळ क्रीडा स्पर्धांचा कार्यक्रम नसून सांस्कृतिक आणि सामाजिक सलोखा जपणारा उसत्व आहे, विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना, कौशल्यांना, धैर्याला वाव मिळण्यासाठी हा बाल महोत्सव महत्त्वपूर्ण असतो, यामध्ये उत्साहाने सहभागी होणे सर्वात महत्त्वाचे असते. या बाल महोत्सवामुळे मुला–मुलींच्या व्यक्तिमत्त्व विकासास चालना मिळेल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

महिला व बालविकास विभागाच्या वतीने पहिला राज्यस्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास विभागीय उपआयुक्त संजय माने. कृष्णा राठोड, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विजय खोमणे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले,बाल विकास प्रकल्प अधिकारी भुजंग चिंताकोटे.सिंहगड कॉलेज संचालक संजय नवले, बाल कल्याण समिती अध्यक्ष. समीर सय्यद, सदस्य सुवर्णा कोकरे, बाल न्याय मंडळ सदस्य गीता तोतकुल यांच्यासह मान्यवर, अधिकारी कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते, यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद म्हणाले, क्रीडा हे एक सांघिक खेळ असून त्यामुळे स्फूर्ती, शिस्त, शारीरिक व मानसिक स्वास्थ्य लाभते. "मुलांनो ,तुम्ही मैदानावर हरले तरी चालेल, पण आयुष्यात कधीही हार मानू नका, आपल्या कर्तृत्वातून आपली ओळख निर्माण करावी राज्यातील पहिलाच 'चाचा नेहरू बालमहोत्सव' सोलापुरात होत असल्याचा अभिमान व्यक्त करत त्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. राज्यस्तरीय बालमहोत्सव घेण्याचा पहिला मान सोलापूरला मिळाला ही आनंदाची बाब असून अनाथ मुलांना त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळावा तसेच अनाथ मुलांचे भवितव्य उज्वल व्हावे हा या महोत्सवाचा उद्देश असल्याचे महिला व बालविकास विभागाचे विभागीय उपायुक्त संजय माने यांनी सांगितले.

या महोत्सवात राज्यातील 36 जिल्ह्यांमधून पुणे, कोकण, छत्रपती संभाजी नगर, नाशिक, अमरावती व नागपूर विभाग या सहा विभागातील अनाथालय व बालगृहातून सुमारे हजारो मुला–मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विविध क्रीडा स्पर्धांमधून व सांस्कृतिक कार्यक्रमातून आपली कौशल्ये ते सादर करत आहेत. हा महोत्सव तीन दिवस चालणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले व चाचा नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून क्रीडा ज्योत पेटवून करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय उपायुक्त महिला व बालविकास संजय माने यांनी केले. या महोत्सवासाठी आलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या राहण्याची व खाण्याची मैदानाची सुविधा दिल्याबद्दल सिंहगड इन्स्टिट्यूट चे संचालक संजय नवले यांचा सत्कार जिल्हाधिकारी श्री आशीर्वाद यांनी केला.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जिल्हा महिला बालविकास अधिकारी विजय खोमणे यांनी केले, तर सूत्रसंचालन रेश्मा गायकवाड जिल्हा बाल संरक्षण कक्ष सोलापूर यांनी केले

# जिल्हा परिषदेत भाजपच्या यशानंतर पालकमंत्री गोरे यांचा सत्कार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर व सातारा जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये भाजपला मिळालेल्या भरघोस यशानंतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा वानकर परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या प्रभावी नियोजनामुळे दोन्ही जिल्ह्यांत भाजपला मोठे यश मिळाले असून, प्रथमच जिल्हा परिषद अध्यक्षपद मिळवण्यात पक्षाला यश आले आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक गणेश वानकर यांनी गोरे यांचा सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले. यावेळी पालकमंत्री गोरे सोलापूर दौऱ्यावर असताना त्यांची सदिच्छा भेट घेण्यात आली. प्रसंगी युवा नेते दत्तात्रय वानकर, विठ्ठल वानकर, प्रसाद गायकवाड, रेवन पुराणिक यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी गणेश वानकर म्हणाले की, पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पदभार स्वीकारल्यापासून सोलापूर जिल्ह्यासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. सातारा जिल्ह्यातील असले तरी त्यांनी सोलापूर शहर व जिल्ह्याशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण केले असून, स्थानिकांच्या मनात आपुलकीची भावना निर्माण केली आहे.